कोण होते

डॉ. दाभोळकर
कॉ. पानसरे
प्रा. डॉ. कलबुर्गी

?

अॅड. के. डी. शिंदे
राजा शिरगुप्पे

VISIT…

लोकशाहीसाठी संघर्ष यात्रेनिमित्त सम्यक विद्रोही व लोकायत
द्वारे प्रकाशित विशेष आवृत्ती
'कोण होते डॉ. दाभोळकर, कॉ. पानसरे, प्रा. डॉ. कलबुर्गी?'

लेखक :

ॲड. के. डी. शिंदे
राजा शिरगुप्पे

प्रकाशक व मुद्रक :

- सम्यक विद्रोही प्रकाशन
  १०७४, बी-५, आनंदी प्रासाद अपार्टमेंट, सी वार्ड,
  रविवार पेठ, कोल्हापूर – ४१६०१२.
  संपर्क : गौतम – 08275918296
- लोकायत
  १२९/बी-२, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड,
  नळस्टॉप जवळ, पुणे – ४११००४.
  (या पत्त्यावर दर रविवार संध्याकाळी ५ ते ७:३० या वेळेत लोकायतची मीटिंग होते.)
  ईमेल : lokayat.india@gmail.com /lokayat.india @lokayat
  संपर्क : अलका – 09422319129

मुद्रणस्थळ :

आर. एस. प्रिंटर्स, ४५५, शनिवार पेठ, पुणे – ३०.

पहिली आवृत्ती : सप्टेंबर २०१६

सहयोग मूल्य : ₹ १०/-

कोण होते
डॉ. दाभोळकर, कॉ. पानसरे,
प्रा. डॉ. कलबुर्गी?

लेखक

ॲड. के. डी. शिंदे
राजा शिरगुप्पे

डॉ. दाभोळकर, कॉ. पानसरे, कलबुर्गी सर...

उठा डॉक्टर
गोळी लागल्यावर असं किती काळ या निबुद्ध पुलावर
पडून राहणार आहात
इथं माणसं नुसतीच ये-जा करतात
थांबत नाहीत
तुमचे सैनिक दर २० तारखेला येऊन इथे
तुमच्या स्मृतींचा दुःखोत्सव करतात
चला उठा
सांगा या सैनिकांना तुमच्या त्या मधाळ शैलीत
आता आगेकूच करायलाच हवी
उठा कॉम्रेड
रायगड गडावर शिवबांनी जेव्हा शेवटचा श्वास घेतला असेल
तेव्हा त्यांच्या मावळ्यांनाही खूप अंधार झाल्यासारखे वाटले असेल
तरीही इतिहासानं मला ऐकवलंय की तब्बल पुढे २७ वर्षे मावळे लढत होते
एका अजगरी सल्तनतीशी
तुमच्या स्मृतीची मशाल मनात जागती ठेवून
तुमच्याही मावळ्यांना सांगा ना
तुमच्या विचारांची मशाल जागवत
तुमच्या त्या मिश्किल शैलीत
अजून खूप वर्षे लढायचं आहे!
उठा सर
घर जरी आपले नसले
तरी प्रत्येक घरातील देवघर
हे आपल्याच मालकीचे
या भ्रमिष्ट त्वेषात ते आले
आणि तुमच्यात वसती बसवण्णांचा नकार ऐकून त्यांनी घराच्या
मालकाचाच देह संपवला गोळीने
उठा सर तुमच्या गणाचारींना आदेश द्या
हीच निर्णायक वेळ आहे मठ-मंदिरांना घेरून उखडून टाकायची!

(टीप : बसवण्णा : लिंगायत धर्माचे संस्थापक : इ.स. १२वे शतक.
गणाचारी : वचन साहित्याच्या संरक्षणासाठी बसवण्णांनी उभे केलेले संरक्षक दल.)

– राजा शिरगुप्पे, 'प्रॉमिथिअस'

भूमिका

आपला देश आता एक भेकड पर्वातून जातो आहे हे नक्कीच. इतिहासाच्या प्रत्येक निर्णायक टप्प्यावर एक गोष्ट साधार दिसून आली आहे की, जेव्हा जेव्हा पुरोगामी विचार जनमानसाची पकड घेऊ लागतात तेव्हा तेव्हा प्रतिगामी शक्ती पिसाळतात अणि हिंसाचाराचा मार्ग अवलंबितात. पुरोगामी विचार पेरणाऱ्या व्यक्तींचा वा समूहाचा नाश करणे हेच त्यांचे एकमेव उद्दिष्ट ठरते. गेल्या तीन वर्षात भारतातही या प्रतिगामी शक्ती वाढत्या पुरोगामी शक्तींच्या प्रभावाने पिसाळून हिंसाचारास प्रवृत्त होत आहेत. त्यांची उदाहरणे प्रत्येक राज्यात दिसून येत आहेत. या प्रतिगामी धर्मांध शक्ती ज्या अस्मितांच्या आधारे स्वतःला तगवतात, त्या अस्मितांना तात्विक अधिष्ठान व राजकीय संरक्षण पुरविणारे पक्ष, संघटना आज या देशात सत्तेवर आहेत.

२० ऑगस्ट २०१३ रोजी डॉ. नरेंद्र दाभोळकरांची सकाळी सकाळीच पुण्यामध्ये हत्या झाली. त्यानंतर दोन वर्षातच कॉ. गोविंद पानसरेंची कोल्हापूर येथे आणि त्यांच्या हत्येला सहा महिने पूर्ण व्हायच्या आतच डॉ. एम. एम. कलबुर्गींची हल्लेखोरांनी त्यांच्या घरीच धारवाड येथे हत्या घडवून आणली. तिघांच्याही हत्येत हल्लेखोरांनी जी कार्यपद्धती अवलंबिली आहे ते पाहता त्याच्यामागे एकाच प्रकारची शक्ती आणि साखळी असावी याबद्दल संशयाला जागा आहे. या तीनही व्यक्तींचे कामही जवळपास सारख्याच पद्धतीचे. तिघेही विवेकाचा, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आणि मानवतेचा आग्रह धरणारे. त्या पद्धतीनेच संपूर्ण आयुष्यभर त्यांची वाटचाल झाली.

प्रतिगामी शक्ती नेहमीच आपल्याला शत्रू वाटणाऱ्या शक्तिंची हत्या करण्याचा मार्ग निवडत असतात. कारण त्यांच्याकडे विवेकशील विचारांचे अधिष्ठान नसतेच मुळी. विवेकशील विचारांकडे जो नैतिकतेचा आणि मानवतेचा पाया असतो त्याच्या जोरावर क्रूसावर बळी जाऊनही, आपला मर्त्य देह संपूनही विवेकशील विचार संपत नाही. इतिहासात हे वारंवार घडले आहे. अगदी चार्वाक- सॉक्रेटिसपासून ही परंपरा सुरू होते. युरोपमध्ये प्रतिगामी शक्तींनी इन्क्विझिशन्स केली. मध्य आशियातील प्रतिगामी शक्तींनी कत्तली केल्या. भारतामध्ये नेहमीच म्हणजे बौद्धांपासून लिंगायतांपर्यंत सर्व पुरोगामी विचारांच्या धर्मपंथांच्या कत्तली करण्यात आल्या. बौद्धांचे हजारो अनुयायी, बसवण्णा व त्यांचे शरण अनुयायी, नामदेव, चोखोबा,

तुकोबा या साऱ्यांच्याच हत्या झाल्या, पण त्यामुळे त्यांचे विवेकशील मानवतावादी विचार कधीच संपू शकले नाहीत. उलट अधिकाधिक विस्तारत राहिले.

सुरूवातीलाच म्हटले आहे की, आपण एका भेकड पर्वातून चाललो आहोत. अशावेळी प्रतिगामी धर्मांध, अविवेकशील, अवैज्ञानिक वृत्ती फोफावतात. कारण त्या मुळात विवेकशील विचाराच्या वाढत्या प्रभावामुळे धास्तावलेल्या असतात. त्यामुळे अलीकडच्या काळात डॉ. नरेंद्र दाभोळकरांपासून सुरू झालेली ही हत्येची मालिका कधी थांबेल हे सांगता येणे अवघड असले आणि यापुढे कुणाचा नंबर याचा तर्क करणेही अवघड असले तरी आता पुरोगामी शक्तींनीही सावध झाले पाहिजे. आपापसातले तपशिलातले किरकोळ मतभेद संपवून देशभर एकजूट उभी केली पाहिजे.

दाभोळकरांची हत्या म्हणजे केवळ 'अंनिस'ने शोक व्यक्त करणे, गोविंद पानसरेंची हत्या म्हणजे एका पक्षाचा शोक किंवा कलबुर्गींची हत्या म्हणजे लिंगायतांमधील पुरोगामी शक्तींचा शोक हे जे काही पृथक चित्र दिसते ते दिसता कामा नये. कारण या साऱ्यांना जोडणारा एक समान दुवा आहे तो म्हणजे विवेकशील, विज्ञाननिष्ठ, मानवतावादी समाज. आपणा सर्वांनाच तो हवा आहे. ज्या भाबड्या सामान्यजनांच्या श्रध्दांचा उपयोग आपल्या स्वार्थासाठी आणि कुटील हेतूसाठी प्रतिगामी शक्ती करत आहेत, ती सामान्य जनतादेखील या महामानवांनी पाहिलेल्या त्या आदर्श समाजाचीच इच्छा करते हे महत्त्वाचे. याच भूमिकेतून विद्रोही सांस्कृतिक चळवळीने या तीन शहीदांचे परिवर्तनवादी चळवळीतील नेमके स्थान व स्वरूप स्पष्ट करण्यासाठी या पुस्तिकेची निर्मिती केली आहे. या देशातल्या फॅसिस्ट शक्ती त्यांच्या जिवावर का उठल्या याचे स्पष्ट भान सामान्य व्यक्ती व कार्यकर्त्यांना येणे गरजेचे आहे. कारण हेच कार्यकर्ते व याच सामान्य शक्ती या तिघांच्या विचारांचे व कार्याचे वाहक आहेत. आपण भेकड पर्वातून जात असलो तरी आपण भेकड नाही. या देशातल्या उन्मादित झालेल्या फॅसिस्ट शक्ती आपल्याच पुरोगामी संविधानाचा उपयोग करून मागील दरवाजाने येऊन सत्ता बळकावत्या झाल्या आहेत. पुरोगामी शक्तींशी थेट सामना करण्याची क्षमता त्यांच्यात नाही. म्हणून ते छुपेपणाने हल्ले करत आहेत. त्यांचे खरे स्वरूप स्पष्ट करणे हाच या पुस्तिकेचा आणि विद्रोही सांस्कृतिक चळवळीचा उद्देश आहे.

या पुस्तिकेच्या लेखनाची जबाबदारी ॲड. के. डी. शिंदे व राजा शिरगुप्पे यांनी स्वीकारली ती याच बांधिलकीच्या भावनेतून. पुस्तिका म्हणून जरी हे लेखन दोघांचे असले तरी त्यातील पहिली तीन प्रकरणे ॲड. के. डी. शिंदे व शेवटची दोन

प्रकरणे राजा शिरगुप्पे यांनी लिहिली आहेत. त्यामुळे पुस्तिकेतील एकूण भूमिका समान असली तरी तपशीलांची जबाबदारी मात्र व्यक्तिगत त्या त्या लेखकाची आहे. ही पुस्तिका लिहिण्यासाठी विद्रोही कार्यकर्त्यांनी व प्रकाशक म्हणून कॉ. धनाजी गुरव यांनी पुढाकार घेतला. या पुस्तिकेच्या निर्मितीची बाजू जयवंत पोवार, सुनील कातकर रोहन शिरगुप्पे आणि सौ. पुष्पलता घोळसे यांनी सांभाळली आहे. लेखकांना स्वतःच्या घरात डांबून त्यांचे यथोचित लाड पुरवून त्यांच्याकडून हे पुस्तक वेळेत लिहून घेण्याचे सर्व श्रेय मा. नामदेव करगणेसर यांचे व त्यांच्या घरातील सर्व मंडळींचे आहे. त्यासाठी विद्रोही चळवळीचे सर्व कार्यकर्ते त्यांच्याप्रती कृतज्ञ आहेत. वाचकांच्या आणि कार्यकर्त्यांच्या या पुस्तिकेबद्दलच्या प्रतिक्रिया अपेक्षित आहेत.

– ॲड. के. डी. शिंदे

– राजा शिरगुप्पे

१.
असंवेदनशील होत चाललेल्या समाजात...

माझा मुलगा वकील झाला. वकिली कामाला सुरुवात केली, कोट-टायमध्ये आलेल्या मुलाला मी इतर वकिलांच्या ओळखी करून दिल्या. काही जणांनी समाधान व्यक्त केलं. काहीजण म्हणाले, "या धंद्यात आता काय राहिलंय? कशाला त्याला वकिलीत आणून बाद करताय? दुसरा कुठलातरी नोकरी धंदा बघा." या प्रतिक्रिया मला तशा काही नव्या नव्हत्या. एके दिवशी मी एका मोठ्या सिनिअर वकिलाची व मुलाची ओळख करून दिली. ते गंभीर झाले. माझ्याकडे रोखून बघत म्हणाले, "हे बघा, तुम्ही पूर्णवेळ वकिली न करता दुसऱ्या कुठल्यातरी फुकटच्या उचापती करत फिरताय. तुम्ही बोंबलत फिरताय ते फिरताय, निदान या पोराला तरी नीट वकिली करू द्या. आंदोलनं, धरणं, मोर्चे, परिवर्तन, विद्रोह, समाजसेवा असलं काय खूळ याच्या डोक्यात घालू नका." समोर दिसले म्हणून मी मुलाची ओळख करून दिली होती. मी त्यांच्याकडून कोणतंही मार्गदर्शन मागितलं नव्हतं. पण त्यांनी मला आपला अनाहूत सल्ला दिला. तोही न मागता आणि फुकट दिला. अलीकडं मला समाजामध्ये अशा प्रकारची माणसं पावलोपावली भेटू लागली आहेत. कोणत्या का मार्गानं असेना पण चार पैसे मिळविले की, माणूस आपोआप स्वतःला विचारवंत आणि समाजाला मार्गदर्शन करण्याची पात्रता प्राप्त झालेला तज्ज्ञ असंच समजायला लागतो. हतबल समाजही असल्यांचंच भंपक तत्त्वज्ञान कान देऊन ऐकतो. खऱ्याखुऱ्या समाजसेवकाच्या वाट्याला मात्र उपेक्षाच येते.

परवा असाच आणखी एक प्रसंग घडला. उजव्या विचारसरणीचे म्हणण्यापेक्षा कोणतीच विचारसरणी नसणारे आणि कायम पांढरीधोट कापडं घालून मागं चार-पाच पोरं घेऊन फिरणारे एक पुढारी माझ्या ऑफिसमध्ये आले. त्यांनी त्यांच्या कामाचे स्वरूप सांगितले. उठून जाताना त्यांनीही मला न मागता सवरता एक सल्ला दिलाच. ते म्हणाले, "वकिलसाहेब, तुम्ही जरा तुमचा बाहेरचा व्याप कमी करा. तुम्ही कामगारांचे चांगले वकील आहात. त्या कामाकडे दुर्लक्ष व्हायला लागलंय. तुम्ही एकट्यानं हातपाय झाडून काय समाज परिवर्तन होणार नाही. मग कशाला तुमचं बौद्धिक कौशल्य वाया घालवताय? त्यापेक्षा वकिलीत फुल टाईम काम करा. चार पैसे मिळतील. सुखा समाधानानं जगू शकाल. बहुजन समाजातील एक चांगला वकील म्हणून तुमची इमेज तयार व्हायला लागलीये, तीच डेव्हलप करा. नसत्या भानगडीत पडू नका." मी त्यांना सुनावलंच. म्हणालो, "नेते तुम्ही माझा

सल्ला घ्यायला आला होता. मला सल्ला द्यायला आला नव्हता.'' मग गडी जरा वरमला आणि त्यानं काढता पाय घेतला.

घरचं खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजणारे, घरावर तुळशीपत्र ठेवणारे, घरची जबाबदारी टाळून भलत्याच उचापती करणारे, प्रस्थापितांना आणि अभिजनांना शिव्या देणारे, नव्या विकासाला विरोध करणारे, परिघाबाहेरील लोकांसाठी बोंब मारणारे अशी एक ना अनेक शेलकी विशेषणं अन्यायाविरुद्ध लढणाऱ्यांच्या वाट्याला येतात. उपेक्षा, टिंगल, टवाळी, उपहास, उपरोध हा त्यांच्या पाचवीलाच पुजलेला असतो. इतकेच नव्हे तर परिवर्तनाच्या लढ्यात अग्रभागी असणाऱ्यांच्या अंत्ययात्रेतही सामील न होता त्रयस्थ नजरेनं बघतात. कॉ. गोविंद पानसरेंच्या खुनानंतर 'माझ्या बापाची अंत्ययात्रा' ही कविता कृष्णा कोरे यांनी लिहिली. त्यात हे दोन घटक ठळकपणे मांडले. ती कविता वास्तवाचं भान देणारी आणि सहृदय माणसाच्या हृदयाला भिडणारी अशी आहे.

समाजसेवेपासून माणसं दूर चालली, परिवर्तनवाद्यांची संख्या रोडावली, माणसं आत्मकेंद्री व्हायला लागली, समाजाशी आपलं काही देणंघेणं नाही असं त्यांना वाटतंय. समाज काय आपली चूल पेटवायला येत नाही असं म्हणत माणसांनी आपल्या भोवती कुंपणच घालून घेतलं आहे. समाजातील काही घटकांनी संवेदना नावाच्या एका संकल्पनेलाच मूठमाती दिलेली आहे. त्यांनी आपला चौकोन आखून ठेवलाय. त्या चौकोनात तो, त्याची बायको, त्याची दोन मुलं, चौकोन पूर्ण. त्यांनी घरालासुद्धा कंपाऊड घालून घेतले. गेट बंद केल्यावर कुणी आत यायची किंवा बाहेर जायची भानगडच नाही. बायका-पोरं, नोकरी-धंदा, पैसा-अडका, पोरं चांगल्या शाळेत, बायको सुखवस्तू, आठवड्यातून वीकएंडला चेंज, हॉटेलिंग, टूर, देवस्थान, प्रेक्षणीय स्थळं या परिघाबाहेर पडायचं कारणच नाही.

नेमकं दुसऱ्या बाजूला रस्त्यावर उतरून परिवर्तनाची लढाई लढणाऱ्या कार्यकर्त्यांच्या वाट्याला वीकएंड येत नाही. तर प्रत्येक 'वीक'मध्ये एक प्रश्न घेऊन मोर्चा काढावा लागतो. पिकनीक नव्हे तर खंडीभर माणसं घेऊन मुंबई नाहीतर नागपूरला, आझाद मैदानात नाहीतर चिटणीस पार्कवर धरणं धरावं लागतं; दंगामस्ती ऐवजी घोषणा द्याव्या लागतात. कुणाला सांगून शिकवून, पटवून कुणी परिवर्तनाच्या चळवळीत येत नसतो. ज्याचं त्यातल्या त्यात बरं चाललंय तो परिवर्तनाकडे फिरकत नाही. ज्याचं बरं चाललं नाही त्यांनाच परिवर्तनाची गरज असते. पण तोही कुणीतरी इतरांनी संघर्ष करावा व त्यातून मिळालेले लाभ अपसूक आपल्याला मिळावेत, याच मानसिकतेत असतो. शोषितांनीच शोषणाविरूद्ध आवाज उठवायला सुरुवात केली

तर मात्र परिवर्तन चळवळीला धार येते. ज्याच्या पोटात दुखतंय, त्यानंच ओवा मागितला पाहिजे. तोच जर दैववादी बनून 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' असे म्हणू लागला; तर मात्र परिवर्तनवादी चळवळीची धार बोथट झाल्याशिवाय राहत नाही. पण अन्यायग्रस्तांना तोंड उघडण्याची संधीच उपलब्ध करून द्यायची नाही अशी समाजरचना आहे. आणि आत्मकेंद्री माणसं तीच समाजरचना घट्ट करायला मदत करत आहेत. आपण समाजाचे देणेकरी आहोत ही भावना जर लुप्त होऊ लागली तर परिवर्तनाचे शिवधनुष्य पेलायचं कुणी हा प्रश्न येतो. जे कोणी राजीखुशीनं असा शिवधनुष्य पेलायला पुढे येतात त्यांच्या वाट्याला तर गोळ्या यायला लागल्या.

परिवर्तनाची चळवळ काय आज सुरू झालेली नाही. इ.स.पूर्वीपासून ती चालू आहे. त्यात सातत्यही आहे. अज्ञानी, अंधश्रद्धाळू, शोषित, पीडित, उपेक्षित, दुर्लक्षित असा घटक जोपर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत परिवर्तनाच्या चळवळींचं काम चालूच राहणार आहे. वर नमूद केल्याप्रमाणे परिवर्तनाच्या चळवळीत काम करणाऱ्यांची संख्या रोडावते आहे काय? तर याचं उत्तर नकारार्थी द्यावं लागेल. संख्या रोडावण्याऐवजी ती वाढते आहे. पण ब्राह्मणी भांडवली व्यवस्थेत काम करणारी माध्यमं त्यांना अनुल्लेखानं मारत आहेत. त्यातच सामाजिक जाणिवा बोथट झालेल्या शिक्षित मध्यमवर्गीयांची त्यात भर पडली आहे. बदलाचं नेतृत्व खरं म्हणजे मध्यमवर्गीयांनीच केलेलं आहे. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेचा खुलेआम स्वीकार केल्यानंतर मध्यमवर्गीय माणूस आपल्यापेक्षा खाली असलेल्या घटकाकडे बघायचाच थांबला. का? कसा? कोण जाणे? तो चंगळवादाकडे वळला. नवश्रीमंत व्हायची त्याला आस लागली. त्यातूनच उच्च मध्यमवर्गीय असा नवा वर्गच अस्तित्वात आला. 'श्रीमंत होण्यासाठी पळा पळा कोण पुढं पळतं ते पाहू' अशी शर्यतच लागली. मध्यमवर्ग नुसता बाहेरच पडला नाही तर तो परिवर्तनवाद्याला परिवर्तनापासून रोखण्यासाठीचे सल्लेही देऊ लागला. हा चंगळवादाचा कळस झाला.

अशा सर्व पार्श्वभूमीवर परिवर्तनाचे तीन शिलेदार व्यवस्थेविरूद्ध लढत राहिले. व्यवस्थेला एकापाठोपाठ एक हादरे देत राहिले. कशाचीही पर्वा केली नाही. दोन वर्षांच्या कालावधीत तिघांनांही सनातन्यांच्या गोळ्यांना बळी पडावं लागलं. विचारांचा पराभव ज्यावेळी विचारानं करता येत नाही, त्यावेळी हतबलतेतून ते शस्त्राचा वापर करतात. तसा त्यांनी तो केला. डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉ. गोविंद पानसरे आणि प्रा. एम. एम. कलबुर्गी यांचे याच भेकड पर्वात एका पाठोपाठ एक मुडदे पाडण्यात आले.

डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉ. गोविंद पानसरे आणि प्रा. एम. एम. कलबुर्गी यांचे खून करण्यात आले. ते खून कोणी केले? का केले? हे सरकारला आणि तपास यंत्रणेला कळण्याअगोदर परिवर्तनाच्या चळवळीत काम करणाऱ्या सजग कार्यकर्त्यांना कळले. खुन्यांची विचारसरणी आणि त्यांचे उद्देश त्यांनी जाहीर करून टाकले. या तिघांनी असे कोणते काम केले होते की त्यांना ठार मारण्यात आले? ते तिघे नेमके कोण होते? हे समाजासमोर आणण्याची परिवर्तनावाद्यांची जबाबदारी आहे. ती या पुस्तिकेत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

तिघांच्याही खुनानंतर माणसं आपणहून रस्त्यावर आली. कुणी न सांगताच संताप व्यक्त करू लागली. घोषणा द्यायला लागली. कुणी न सांगता रस्त्यावर उत्स्फूर्तपणे सनातन्यांच्या विरोधात घोषणा दिल्या गेल्या. हे एक-दोन ठिकाणी नव्हे तर महाराष्ट्र व कर्नाटकातही वेगवेगळ्या ठिकाणी झालं. सरकारने खुनी हुडकायच्या अगोदर लोकांनी आपापल्या पद्धतीने खुनी कोण आहेत हे जाहीरपणे व ठामपणे सांगितलं. रस्त्यावर आलेली सारी माणसं दाभोळकर, पानसरे, कलबुर्गींना ओळखत होती असेही नाही. त्यांच्या ओळखीची, बिगर ओळखीची पण त्यांच्या विचारानं प्रभावित झालेली सारी माणसं रस्त्यावर आली. त्यांच्याबरोबर सनातनी उन्मादाला वैतागलेली माणसंही रस्त्यावर आली.

तसं पाहिलं तर आपल्या समाजात खून काय कमी होत नाहीत. दररोज मुडदे पाडले जातात. पण त्यासाठी कधी कुणी रस्त्यावर येत नाही. मग या तिघांच्या खुनानंतर इतकी माणसं रस्त्यावर का आली? मोर्चे का काढले? आंदोलने का झाली?, निषेधाच्या मालिकेची वात राज्यभर कशी पेटली? एवढं करायला हे तिघे होते तरी कोण? त्यांना कोणी मारलं? का मारलं?. ज्या हातानं गोळी झाडली त्या हाताच्या मागं कोण? मेंदू कोणाचा? हे सगळं सविस्तरपणे साऱ्यांना माहित आहे. अगदी सरकार आणि पोलीसांनाही माहीत आहे. खरा प्रश्न आहे तो डॉ. दाभोळकर, कॉ. पानसरे, प्रा. कलबुर्गी हे कोण होते हे जाणून घेण्याचा. राजे, महाराजे, आमदार, खासदार, मंत्री, संत्री यापैकी तरी कुणी नव्हते. मग त्यांच्यासाठी इतकी आदळआपट का केली जाते? खुनी शोधा म्हणून सरकारच्या मागे ही माणसं का लागली? सर्व पुरोगामी परिवर्तनवादी पक्षांना व संघटनांना त्यांच्या खुनाचं काय पडलंय?

त्या तिघांना का मारले हे लोकांना माहीत आहे. कुणी मारले हेही माहीत आहे. प्रश्न आहे तो त्यांच्या खुनानंतर माणसं का पेटून उठली? तेही आपसूकच सनातन्यांविरूद्ध का उठली? त्यांच्या मरण्यानं समाजाचा नेमका काय तोटा झाला? आणि ते जगले असते तर समाजाचा असा कोणता फायदा झाला असता? वैयक्तिक

फायद्या-तोट्यापेक्षा सार्वजनिक पातळीवर माणसं कसा काय विचार करायला लागली? या सगळ्यांची उत्तरं डॉ. दाभोळकर, कॉ. पानसरे आणि प्रा. कलबुर्गी यांच्या कामाच्या सातत्यातच सापडतात. त्यांनी जे काम स्वीकारलं होतं ते राजीखुषीनं विचार करून स्वीकारलं होतं आणि अखेरच्या श्वासापर्यंत केलं.

ॐ

२.

“मला माहिती आहे समोरच्या गर्दीतला कुणीतरी माझ्यावर गोळी झाडायला टपलाय, पण मी त्याला सांगू इच्छितो, हे बघ मित्रा, या बंदुकीच्या पाठीमागे हात असतात ते फक्त भित्र्या माणसाचे. म्हणूनच टाक ती बंदूक, सोड ती भीती, चल आपण दोघे मिळून शोधूया प्रकाशाच्या नवीन वाटा.”

– डॉ. नरेंद्र दाभोळकर

२० ऑगस्ट २०१३ रोजी सांगलीतले आम्ही काही कार्यकर्ते संध्याकाळी साताऱ्यामध्ये डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या अंत्यदर्शनासाठी गेलो होतो. डॉक्टरांच्या घरासमोर रस्ता, त्या रस्त्यापलीकडे मोकळे मैदान, तिथं मंडप उभा केलेला. मंडपात डॉक्टरांचा मृतदेह ठेवलेला. अंत्यदर्शनासाठी रांग लागलेली. सर्व वातावरण शोकाकूल. अंत्यदर्शन घेऊन आमच्यातले काही कार्यकर्ते डॉक्टरांच्या घरात गेले. तिथंही गर्दीच होती. कार्यकर्ते एका बाजूला उभे राहिले. गर्दी ओसरली. डॉ. शैलाताई दाभोळकरांनी अनोळखी व बुजरे कार्यकर्ते पाहिले. त्या उठून कार्यकर्त्यांजवळ आल्या. त्यांचे नाव गाव विचारले आणि खचून जाऊ नका, पूर्वीप्रमाणेच काम करा, धीर सोडू नका अशा शब्दांत कार्यकर्त्यांचे सांत्वन केले. ज्यांचे सांत्वन करायला आम्ही गेलो त्यांनी आमचं सांत्वन केलं. डॉ. शैलाताईंना इतकं बळ कोठून मिळालं? याचं उत्तर आहे डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या विवेकवादी सहवासातूनच. डॉ. दाभोळकरांची पत्नी, मुलगा, मुलगी सर्वचजण विज्ञाननिष्ठ, विज्ञानवादी, विवेकवादी, संयमी आणि कोणत्याही कठीण प्रसंगाला धीराने तोंड देणारे.

ॲड. अच्युतराव दाभोळकर नावाच्या सातारच्या ख्यातनाम वकिलाच्या पोटी डॉ. नरेंद्र दाभोळकरांचा १ नोव्हेंबर १९४५ रोजी जन्म झाला. ॲड. अच्युतरावांना एकूण दहा अपत्ये. त्यापैकी शेवटचं म्हणजे शेंडेफळ डॉ. नरेंद्र दाभोळकर. दाभोळकरांची सर्वच भावंडे आपापल्या क्षेत्रात प्रभाव निर्माण करणारी व स्वतःचा वेगळा ठसा उमटविणारी. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू देवदत्त दाभोळकर हे डॉ. दाभोळकरांचे मोठे बंधू. त्यांनी डॉ. नरेंद्र दाभोळकरांचे वर्णन अत्यंत यथार्थ शब्दांत केले आहे. डॉक्टरांच्या विद्यार्थी दशेतच त्यांनी म्हटले होते की, दाभोळकरांच्या दसकर्डीपैकी नरेंद्र हे सर्वोत्तम कडे आहे. नरेंद्र दाभोळकर हे बालपणापासून अभ्यासात व खेळात कौशल्य असणारे होते.

साताऱ्यात शिवाजी उदय मंडळ खेळाडू घडविण्याचे काम करत होतं. त्याच मंडळाचे खेळाडू डॉ. नरेंद्र दाभोळकर हे निष्णात कबड्डीपट्टू म्हणून नावारूपास आले. शालेय जीवनात सुरू झालेली कबड्डीची आवड डॉक्टरांनी कॉलेज जीवनातही जोपासली. विद्यापीठ स्तरापासून ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत त्यांनी कबड्डी या खेळामध्ये आपली चुणूक दाखविली. त्यांच्या या क्रीडा नैपुण्यापुळेच महाराष्ट्र शासनाचा 'शिवछत्रपती पुरस्कार' त्यांना मिळाला. या पुरस्काराचा एक फायदा असा की, त्यांना महाराष्ट्रभर एस.टी. चा प्रवास मोफत असतो. डॉ. दाभोळकरांनी या सवलतीचा फायदा जास्तीत जास्त उठविला आणि आपले अंधश्रद्धा निर्मुलनाचे काम सवलतीच्या प्रवास खर्चाने केले. मुळातच बुद्धिमान असल्याने त्यांना मिरजेच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गुणवत्तेवरच प्रवेश मिळाला. ते एम.बी.बी.एस. झाले. त्यांनी महाविद्यालयाच्या गैरव्यवस्थापनाविरूद्ध आंदोलन करून संघर्षाची चुणूक दाखविली. वैद्यकीय विद्यार्थ्याला शिक्षण पूर्ण केल्यानंतर दोन वर्षे सरकारी सेवेची सक्ती केली जाते. त्यानुसार त्यांनी सातारा जिल्ह्यातील परळी या खेड्यात वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले. तसेच आय.टी.आय मध्येही वैद्यकीय अधिकारी म्हणून त्यांनी काम केले. सरकारी नोकरीत असताना त्यांनी वेगवेगळ्या चळवळी केल्या. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी शेतमजुरांचे संघटन करण्याचा प्रथम प्रयत्न केला. बऱ्याच अंशी ते यशस्वीही झाले. वैद्यकीय अधिकारी म्हणून सरकारी नोकरी करत असताना रविवारच्या सुट्टीत खेडोपाडी जाऊन त्यांनी शेतमजुरांची एकजूट केली. संघर्षही केला. भूमिहीन दलितांना त्यांची हक्काची जमीन मिळावी यासाठी डॉ. दाभोळकरांनी प्रयत्न केले.

डॉ. बाबा आढावांच्या नेतृत्वाखाली 'एक गाव एक पाणवठा' हे समतेचे आंदोलन महाराष्ट्रभर झाले. साताऱ्यातील या आंदोलनाची जबाबदारी डॉ. दाभोळकरांवर होती. लोकप्रतिनिधींचा डोळा मतावर असतो. राज्य घटनेतील समता-बंधुता यांच्याशी त्यांचे काहीही देणे-घेणे नसते, याची प्रचिती दाभोळकरांना दलित हक्क आणि एक गाव एक पाणवठा या चळवळीत आली. शेतमजुरांचे संघटन, दलितांवरील अन्याय निर्मूलन इ. चळवळी डॉ. दाभोळकर करीत असतानाच मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर प्रश्नाने उग्र रूप धारण केले. डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी सातारा ते औरंगाबाद लाँगमार्च काढायचा निर्णय घेतला. मोजक्या समतावादी कार्यकर्त्यांना सोबतीला घेऊन साताऱ्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निवासस्थानाला अभिवादन करून पायी चालत औरंगाबादकडे डॉ. दाभोळकर यांनी लाँगमार्च काढला. रस्त्यात या लाँगमार्चला प्रचंड प्रतिसाद मिळाला. जागोजागीचे कार्यकर्ते लाँगमार्चमध्ये सहभागी झाले. त्याचा परिणाम म्हणून तरुणांच्या जथ्याचे

विशाल लाँगमार्चमध्ये रुपांतर झाले. सरकारच्या डोळ्यात खुपण्याएवढी संख्या वाढली. सरकारने लाँगमार्चचा धसका घेतला. अहमदनगर येथेच डॉ. दाभोळकरांना त्यांच्या प्रमुख सहकाऱ्यांसह अटक केली. त्यामुळे नामांतरवाद्यांच्या लाँगमार्चला औरंगाबादपर्यंत पोहोचता आले नाही.

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्यावर सुरुवातीपासूनच समाजवादी विचारांचा प्रभाव होता. साधारणपणे १९७०-८० च्या दशकात महाराष्ट्रातील तरुणांचा नास्तिकतेकडे कल वाढत चालला होता. डॉ. दाभोळकर हे तर बालपणापासूनच निरीश्वरवादी होते. त्यांनी 'समाजवादी युवकदल'ची स्थापना केली आणि त्या माध्यमातून काम सुरू केले. डॉ. दाभोळकर मिरज मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत होते त्यावेळी त्यांचे वडीलबंधू देवदत्त दाभोळकर हे सांगलीतील चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य होते. लोकनेते जयप्रकाश नारायण सांगलीला आले असता दोन दिवस प्राचार्य दाभोळकरांच्या कॉलेजच्या गेस्ट हाऊसवर वास्तव्यास होते. विद्यार्थी दशेतील नरेंद्र दाभोळकरांना जयप्रकाश नारायण यांचा सहवास लाभला. जयप्रकाश नारायण जायला निघाले. निरोप घेतांना त्यांना नरेंद्र दिसला नाही. त्यांनी त्यांना बोलावून घेतले. पाठीवर थाप मारली आणि म्हणाले, 'कुछ बनो.' जयप्रकाशांच्या त्या 'कुछ बनो' या दोन शब्दांनी नरेंद्र दाभोळकरांची पाठ सोडली नाही. त्या दोन शब्दांनीच त्यांना समाज कार्याची प्रेरणा दिली. त्यातूनच साधारण १९८३ पर्यंत वेगवेगळ्या संघटनांच्या माध्यमातून डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी समाजवादी समाज रचनेसाठी वेगवेगळी आंदोलने केली.

साधारण १९८३ पासून डॉ. नरेंद्र दाभोळकरांना विवेकवादाचा सूर सापडला. बी प्रेमानंद हे वेगवेगळ्या चमत्काराचे प्रयोग दाखवून त्यातील फोलपणा लोकांसमोर आणत होते. 'जादू ही हातचलाखी असते आणि इतर चमत्कार हे चमत्कार नसून त्यास शास्त्रीय आधार आहे' हे बी. प्रेमानंद सप्रमाण प्रयोग दाखवून लोकांना पटवून देत. डॉ. नरेंद्र दाभोळकर बी. प्रेमानंदच्या प्रयोगाने प्रभावित झाले आणि बी. प्रेमानंदच्या जवळ जवळ शंभर कार्यक्रमांचे नियोजन डॉ. दाभोळकरांनी केले. त्यानंतर रीतसर डॉ. नरेंद्र दाभोळकर, श्याम मानव, डॉ. बाबा आढाव आदी मंडळींनी एकत्र येऊन 'अंधश्रध्दा निर्मूलन समिती'चे काम सुरू केले आणि ते काम शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी अखंडपणे केले.

अंधश्रध्दा निर्मूलन समितीची सुरुवातच कार्यकर्त्यांची शिबीरे घेऊन झाली. त्यात लोणावळ्याचे शिबीर प्रभावी झाले. महाराष्ट्रभर शिबीरं घेताना बाबा आढाव, डॉ. नरेंद्र दाभोळकर, शाम मानव, वि. म. दांडेकर यांनी अंधश्रध्दा निर्मूलनाचा विचार रुजविला. शिबीरात मार्गदर्शन करतांना नेमकेपणाने विवेकवादी, संयमी मांडणी

करण्यात डॉ. दाभोळकर इतर वक्त्यांपेक्षा सरस ठरले आणि त्यांची सरसताच अंधश्रध्दा निर्मूलन समितीत फूट पडण्यास कारणीभूत झाली. १९८९ साली डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी 'महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती'ची रीतसर स्थापना केली. श्याम मानव 'अखिल भारतीय अंनिस' चालवू लागले. दोन्हीही नेते विचारवंत असल्याने त्यांनी एकमेकांवर कधीही टीका केली नाही. परस्परांना पूरक असेच काम केले. लहान मोठा असा भेदभाव न करता रेल्वेच्या रुळाप्रमाणे दोन्ही संघटना समांतर काम करत राहिल्या.

महाराष्ट्र अंनिसच्या स्थापनेनंतर मात्र डॉ. दाभोळकरांनी पायाला भिंगरी बांधून उभा महाराष्ट्र पिंजून काढला. महाराष्ट्र अंनिस ही त्यांचा श्वासच बनली. डॉ. बाबा आढाव, गं. बा. सरदार, नरहर कुरूदंकर या राज्यस्तरीय नेत्यांबरोबर काम करीत असताना डॉ. दाभोळकरांनी सर्व क्षेत्रातील माणसांना आपल्याबरोबर जोडून घेतले. त्यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष चळवळीचे काम करायला भाग पाडले. कोण्या माणसाचा कुठे आणि कसा उपयोग करून घ्यायचा याचं भान डॉ. दाभोळकरांना होतं. अगदी सिनेनाट्य कलाकारांपासून ते विविध राजकीय पक्षातल्या नेत्या कार्यकर्त्यांना सरकारी-निमसरकारी नोकरांपासून माध्यमांमध्ये काम करणाऱ्यांपर्यंत सर्वांनाच डॉ. दाभोळकरांनी महाराष्ट्र अंनिसच्या प्रवाहात आणले. अंनिसचं पहिलं काम चमत्कार सादरीकरणापासून सुरू झालं. पुढच्या टप्प्यात बुवा-बाबांचे भांडाफोड, त्याचबरोबर विज्ञान वाहिनी, युवा एल्गार मोहीम, शोध भुताचा बोध मनाचा, भानामती विरोधी धडक मोहीम, भूत दाखवा-बक्षीस मिळवा, जादूटोणा विरोधी कायदा, जातपंचायीस मूठमाती अशी माणसाच्या जीवनात सर्वांगांना स्पर्श करून जाणारी आंदोलने केवळ पंचवीस वर्षांच्या कालखंडात केली. भारतीय राज्यघटना आणि त्यातील धर्मनिरपेक्षतेचे तत्त्वज्ञान याच्याशी कधीही तडजोड न करता चळवळ चालविली. डॉ. दाभोळकरांची चळवळ ही विज्ञाननिष्ठ व विवेकवादी तर होतीच पण त्याचबरोबर सहिष्णु, घटनात्मक, दुसऱ्याच्या मताचा आदर करणारी, कोणत्याही धर्माला, देवाला विरोध न करणारी होती. दाभोळकरांचा व त्यांच्या चळवळीचा कोणत्याही देवाला व धर्माला विरोध नव्हता. पण समाजच विवेकवादी बनला तर... त्यामुळे देवाधर्माच्या नावावर पोट भरणाऱ्यांनी मात्र त्यांची प्रतिमा धर्मबुडवे अशी बनविली. डॉ. दाभोळकर धर्म बुडवे नव्हते. ते होते देवाधर्माच्या नावावर पोट भरणाऱ्यांचा रोजगार बुडवे. म्हणून तर त्यांना त्यांच्या गोळीची शिकार व्हावे लागले.

१९९१ साली पुणे जिल्ह्यातल्या ओतूर येथे वाघमारे बुवाने उच्छाद मांडला होता. भोंदूगिरीबरोबरच तो उच्चभ्रू कुटूंबातील सुखवस्तू महिलांचे खुलेआम लैंगिक शोषण करीत होता. ही त्याची बनवेगिरी अंनिस कार्यकर्त्यांनी उघडी पाडली.

त्यावेळी भास्करराव मिसर पुण्याचे पोलीस कमिशनर होते. वाघमारेने समाजविरोधी कृत्य केल्याचे स्पष्ट होते. पण त्यांच्यावर गुन्हा कोणत्या कायद्याखाली रजिस्टर करायचा हा गहन प्रश्न होता. त्यातून पुढे अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा करावा ही बाब पुढे आली. अनेक प्रकारचे संघर्ष करून अखेर 'जादूटोणाविरोधी कायदा' झाला. पण तो दाभोळकरांच्या मृत्यूनंतर झाला. जादूटोणाविरोधी कायद्याचा संघर्ष फारकाळ चालला. १९९१ ते १९९५ पर्यंत हा कायदा करावा म्हणून विविध पातळ्यांवर आंदोलने झाली. ७ जुलै १९९५ ला विधान परिषदेमध्ये एका खाजगी विधेयकावर मतदान होऊन कायदा करावा असे संमत झाले आणि बरोबर अठरा वर्षानंतर 'जादूटोणाविरोधी कायदा' झाला. जादूटोणाविरोधी कायदा करण्याच्या संघर्षाच्या इतिहासाची व्याप्ती इतकी मोठी आहे की, तो स्वतंत्र पुस्तकाचा विषय आहे. जादूटोणाविरोधी कायदा व्हावा यासाठी सर्वप्रकारची आत्मक्लेश आंदोलने डॉ. दाभोळकरांनी केली. अर्ज, विनंत्या, निवेदने, लोकप्रतिनिधींना भेटून चर्चा करणे, धरणे, उपोषण, मोर्चे, जेलभरो यांसह रक्ताने पत्र लिहिणे, स्वतःच्या थोबाडीत मारून घेणे इ. सर्व प्रकारची आंदोलने या कायद्याच्या मंजूरीसाठी केली. असंख्य लोकप्रतिनिधी वेगवेगळ्या समाज घटकांचे प्रतिनिधी, वारकरी संप्रदायाचे प्रतिनिधी अशा विविध मंडळींशी त्यांनी संवाद साधला होता.

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी २२५ हून अधिक अंनिसच्या शाखा सक्षमपणे सुरू करण्यासाठी त्यांनी हजारो कार्यकर्त्यांची मजबूत अशी फळी निर्माण केली. १९८५ साली स्थापन झालेल्या 'सामाजिक कृतज्ञता निधी' या संस्थेचेही पालकत्व डॉ. दाभोळकरांनी स्वीकारले. महाराष्ट्रामध्ये ध्येयवादाने झपाटलेल्या बऱ्याच सामाजिक कार्यकर्त्यांवर आर्थिक ओढाताणीचे प्रसंग येतात. उत्पन्नाचे साधन नसताना काहीजण पूर्णवेळ समाजकार्य करतात. अशा सामाजिक कार्यकर्त्यांना काही ना काही नियमित आर्थिक मदत करण्याची तरतूद सामाजिक कृतज्ञता निधीतून केली गेली. महाराष्ट्रभर फिरणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी अशा कार्यकर्त्यांना नेमके हेरून त्यांना या निधीचा लाभ दिला. समाजाला परिवर्तनाच्या ध्येयाकडे घेऊन जाणाऱ्या धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांनी बळ दिले. अंनिसमध्ये काम करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांनी प्रथम त्यांचा नोकरी, कामधंदा, व्यवसाय करून इतर वेळ चळवळीसाठी द्या असंच सांगितले.

डॉ. नरेंद्र दाभोळकर हे साहित्यिक होते. त्यांनी एकूण १२ पुस्तके लिहिली. 'भ्रम आणि निरास' हे १९८५ साली प्रसिद्ध झालेले त्यांचे पहिले पुस्तक, ज्याला थोर समाजवादी विचारवंत ना. ग. गोरे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. 'श्रद्धा अंधश्रद्धा', 'ऐसे कैसे झाले भोंदू', 'विचार तर कराल', 'तिमिरातून तेजाकडे', 'अंधश्रद्धा :

प्रश्नचिन्ह व पूर्णविराम' अशा अनेक पुस्तकातून त्यांनी विज्ञाननिष्ठ, समतावादी वैचारिक लेखन केले. मूल्यांवर आधारित नवसमाज रचना करण्यासाठी प्रयत्न करत राहणं व याच मार्गाने समता प्रस्थापित करणं यासाठी दाभोळकरांनी साहित्यनिर्मिती केली. याशिवाय विविध मासिकं, साप्ताहिकं, दैनिकं यामधूनही त्यांनी उद्बोधक लेखन केले. ते स्वतः साहित्यिक होतेच, पण महाराष्ट्रातील अनेकांना त्यांनी लिहितं केलं. अनेक साहित्यिक निर्माण केले. डॉ. नरेंद्र दाभोळकर हे चळवळीचे साहित्यिक होते. विचारावर त्यांची ठाम श्रद्धा होती. समाज परिवर्तनाचं काम करणारे मुस्लिम सत्यशोधक आणि मुस्लिम धर्माची चिकित्सा करू पाहणारे हमीद दलवाई यांचा अकाली मृत्यू झाला. ती गोष्ट डॉ. दाभोळकरांना चटका लावून गेली. त्या समाजसुधारकाच्या स्मृती जपण्यासाठीच दाभोळकरांनी आपल्या मुलाचे नाव 'हमीद' ठेवले. जातीअतांचा लढा कृतीशील करण्यासाठी डॉ. दाभोळकरांनी आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले.

साधारण २००० सालापर्यंत विवेकवादी, विज्ञाननिष्ठ चळवळ म्हणून त्यांनी फक्त अंनिसचे काम केले. देवाधर्माला कधीही विरोध केला नाही. पण देवाधर्माच्या नावावर चाललेल्या शोषणाला त्यांनी ठाम विरोध केला. डॉ. दाभोळकरांचे एक सहकारी नटसम्राट डॉ. श्रीराम लागू यांनी 'देवाला रिटायर करा' अशी जाहीर भूमिका घेतली. आणि ती भूमिका दाभोळकरांचीच आहे असा डांगोरा पिटून देवाधर्माच्या नावावर समाजाचा शोषण करणाऱ्या सनातनी मंडळींनी डॉ. दाभोळकरांवर ते धर्म बुडवे आहेत असे आभासी चित्र समाजासमोर उभे केले.

डॉ. दाभोळकर हे महाराष्ट्र अंनिसचे संस्थापक. पण त्यांनी आपल्या हयातीतच कार्याध्यक्षपद सोडले. खरं म्हणजे पद किंवा सत्ता लोकांना सोडवत नाही. अखेरपर्यंत पदावर राहणे, मृत्यूनंतर घराण्याचाच वारस पदावर असणे ही आपल्या सार्वजनिक क्षेत्रातली वास्तवता आहे. पण आपल्याच एका चांगल्या कार्यकर्त्याला हेरून अविनाश पाटील यांच्यावर कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपविणारे डॉ. नरेंद्र दाभोळकर हे अफलातून व्यक्तिमत्व. भल्याभल्यांना पदाचा मोह सोडवत नाही. डॉक्टरांनी मात्र तो सोडला. आचरणात आणला. अविनाश पाटीलना पूर्ण स्वातंत्र्य दिले. कोणतीही मतं त्यांच्यावर लादली नाहीत. स्वातंत्र्याच्या पहिल्या वर्षपूर्ती दिवशी समाजवादी विचाराला वाहून घेतलेले साधना हे साप्ताहिक, पूज्य साने गुरूजींनी सुरू केले. समाजवादी विचारधारा असणाऱ्या साधनेचे संपादक म्हणून आचार्य जावडेकर, रावसाहेब पटवर्धन, यदुनाथ थत्ते, नानासाहेब गोरे, वसंत बापट, ग.प्र. प्रधान इ. दिग्गजांनी जबाबदारी पार पाडली. १९९८ साली साधनेला ५० वर्षे पूर्ण झाली. सुवर्णमहोत्सवी वर्षातच संपादक पदाची जबाबदारी डॉ. नरेंद्र दाभोळकर

यांच्यावर आली. आणि ती शेवटपर्यंत राहिली. त्यापूर्वी साधनेचा लेखकवर्ग, वाचकवर्ग, सहानुभूतीदार आणि हितचिंतक हे क्लासिक मध्यमवर्गीय लोकच होते. त्यांची संख्या रोडावत चालली होती. साधनेचा परीघ ठरलेला होता. परंतु डॉ. दाभोळकरांनी साधनेची चौकट रुंदावली, परीघ मोठा केला. तेच तेच शहरी मध्यमवर्गीय लेखक यांचे स्थान अबाधित ठेवून डॉक्टरांनी साधनेत नवीन ग्रामीण भागातील लेखकांना प्रोत्साहन देत लिहिते केले. समाजवादी परिवाराचे साप्ताहिक प्रत्येक पुरोगामी व परिवर्तनवादी मंडळींना आपले वाटण्याइतपत साधनेच्या कक्षा रुंदावल्या. रोडावत चाललेली साधनेची वर्गणीदारांची संख्या मोहिम काढून वाढविली. बालकुमार दिवाळी अंक, युवा दिवाळी अंक, नियमित दिवाळी अंक असे तीन तीन दिवाळी अंक काढण्याची किमया केली. विषयांची विविधता वाढविली. अंकांची वाचनीयता, रंजकता वाढविली. ग्रामीण बहुजनांना जाणीवपूर्वक लिहिते केले. साधनेच्या संपादनाबरोबरच अंनिस वार्तापत्राचे काम त्यांनी आपल्या सहकाऱ्यांवर स्वतंत्रपणे जबाबदारी सोपवून सातत्याने चालविले. चमत्कार सादरीकरण, बुवा-बापूंचे भांडाफोड, देवाधर्माच्या नावावर केलेले शोषण, अघोरी उपचार, पशुहत्या बंदी, कुंडलीचे दहन, लेखन, व्याखानं, प्रबोधनं, विज्ञान वाहिनी, समता इ. विषयावर काम करताना सनातनी मंडळी दुखावली होती. परंतु डायरेक्ट त्यांच्यावर हल्ला नव्हता. मवाळपणे व प्रभावीपणे काम सुरू होते. सनातन्यांची माथी भडकली ती डॉक्टरांच्या अखेरच्या पर्वातील तीन प्रमुख प्रबोधन चळवळींनी. त्यातली पहिली होती शनी शिंगणापूरच्या चौथऱ्यावर महिलांना प्रवेश नाकारण्याविरुद्धची, दुसरी होती गणपती दान आणि निर्माल्याचे खत तयार करण्याची आणि तिसरी होती जात पंचायतींना मूठमाती देण्याची. या तीनही चळवळी सनातन्यांच्या दांभिकतेला धक्का देणाऱ्या आणि बहुजनांच्या शोषणाविरुद्धच्या पर्यावरण रक्षणाच्या होत्या. म्हणजे त्या घातक रुढींविरुद्ध होत्या. समाजातील अज्ञानाचा आणि अंधश्रद्धेचा फायदा घेऊन शोषण करणाऱ्या समाजाची घडी विस्कटणाऱ्या दांभिकांच्या विरोधातील होत्या. थोडक्यात या तीनही चळवळी धर्मचिकित्सा करणाऱ्या होत्या. त्यामुळेच सनातन्यांची माथी भडकली.

सोनियाचा कळस । पाजी भरिला सुरारस ॥
मृत्तिकेचा घट । पाजी अमृताची सार ॥

सोन्याच्या भांड्यातील दारू विवेक मारते. मातीच्या कपातील अमृत जीवनाला उभारी देते. धर्माच्या नावावर सोनेरी घटात असत्याची झिंग आणणारी दारू भरून समाजाला धर्म मार्तंडानी झिंगत ठेवले. डॉक्टरांनी सत्याचे अमृत मातीच्या भांड्यात ठेवून जनमानसाचा विवेक जागा केला.

गणपती नदीत, विहीरीत, तळ्यात विसर्जन करण्यामुळे पाणी दूषित होते त्यामुळे गणपती दान करा ही मोहीम डॉ. दाभोळकरांनी राबविली. पहिल्यांदा या आंदोलनाला प्रखर विरोध झाला. गणेशमूर्ती आमचा श्रद्धेचा व धर्माचा भावनिक विषय आहे. ती दान करण्याची वस्तू नाही असा गलका धर्माच्या ठेकेदारांनी केला. पुढचा प्रश्न आला तो निर्माल्याचा. गणेश मूर्तीबरोबरच पानं, फुलं, दुर्वा, गौरीची पानं इत्यादी सर्व निर्माल्य वाहत्या पाण्यात टाकून पाणी दूषित करू नये. त्याऐवजी निर्माल्य एकत्रित करण्याची मोहीम अशाच वादाच्या भोवऱ्यात ढकलण्याचं कारस्थान धर्माच्या लाभार्थ्यांनी केलं. परंतु दहा बारा वर्षांच्या सततच्या प्रबोधनानं, रस्त्यावरील चळवळीनं, न्यायालयीन लढ्यानं पर्यावरणाचा हा विषय यशस्वीपणे निकालात काढण्याचं काम डॉ. दाभोळकरांनी केलं. आज निर्माल्यापासून खत निर्मिती करण्यात येऊ लागली आहे. गणेश मूर्तीचं विसर्जन वाहत्या पाण्यात न करता कुंडात विसर्जन करण्याकडे समाज वळविण्यात डॉ. दाभोळकरांना यश आलं आहे. गणेशमूर्ती प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या करू नका, शाडूच्या अथवा कागदी लगद्यापासून त्या बनविण्याचे प्रबोधनही त्यांनी केले. फटाके मुक्त दिवाळीची संकल्पना प्रभावीपणे राबविली. होळीमध्ये नैवद्य म्हणून पोळ्या, भात इ. टाकण्याचे संस्कार समाजामध्ये आहेत. त्याचप्रमाणे होळीत लाकडे जाळण्याचेही फॅड मोठा प्रमाणात आहे. लाकूड-शेणी जाळून आपण पर्यावरणाचा ऱ्हास करत आहोत. उपासमार असणाऱ्या देशात पोळ्या विस्तवात जाळून खाक करणे शहाणपणाचे नाही. त्यामुळे होळी लहान करा आणि पोळी दान करा. या विषयावरही त्यांनी प्रबोधन सुरू केले. परंपरागत चालत आलेल्या या अवैज्ञानिक, अविवेकी व पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या बाबीसच आपली समृद्ध धार्मिक संस्कृती म्हणणारे सनातनी त्यामुळे पिसाटले. त्यांनाही धर्मात ढवळाढवळ वाटली. मनुस्मृतीच्या कायद्याप्रमाणे धर्मचिकित्सा करायची नसते. हा फॅसिझमच आहे. त्यामुळे धर्मचिकित्सा करणाऱ्यास जिवंत राहण्याचा अधिकार नसतोच. त्यात न शिकलेल्या व मनुस्मृती वा इतर कायदे काहीही माहीत नसलेल्या काही जात समूहात जातपंचायती प्रभावीपणे आजही काम करत आहेत. गोर गरीब, भटके, अर्धपोटी, अज्ञानी माणसाचे प्रचंड शोषण जातपंचायती करतात. त्या जातपंचायतीस मूठमाती देण्यासाठी डॉ. दाभोळकर राज्यभर परिषदा घ्यायला लागले. ही सुद्धा धर्मचिकित्साच. या सर्व धर्मचिकित्सा सहन न झाल्यानेच दाभोळकरांना फॅसिस्ट सनातन्यांच्या गोळीचा बळी व्हावे लागले.

३.

ज्यांना कुणाला माझं वाईट करायचं असेल त्यांनी खुशाल करावं. मी कुणाच्या बापाला भीत नाही.

– कॉ. गोविंद पानसरे

२६ नोव्हेंबर १९३३ रोजी कोल्हार ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर या ठिकाणी हातावर पोट असणाऱ्या, राबणाऱ्या बहुजन कुटुंबात गोविंद पानसरे यांचा जन्म झाला. कोल्हार हे गाव प्रवरा नदीकाठी वसलेलं. पण प्रवराच बारमाही नसल्यानं गाव तसं जिरायतच. शिक्षणाची सोय सातवीपर्यंतच. इतर सर्व ग्रामस्थांच्या पोरांप्रमाणेच गोविंद पानसरे कोल्हारच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत सातवीपर्यंत शिकले. माध्यमिक शिक्षणासाठी शहरात जावे लागणार होते. पोराला शहरात शिक्षणासाठी ठेवून पुढं शिकवायची बापाची कुवत नव्हती. म्हणून इतर पर्यायांचा शोध सुरू केला. मग प्रवरेकाठच्या या गोविंदाला वारणाकाठचा दुसरा गोविंद भेटला. कोल्हापूर जिल्ह्यातील मलकापूर परिसरातील गोविंद दामोदर पत्की नावाचे एक शिक्षक सध्या जिथं महात्मा फुले कृषी विद्यापीठ आहे त्या राहुरी या ठिकाणी काम करत होते. त्यांनी गोविंद पानसरेंची राहुरीच्या बोर्डिंगमध्ये राहण्याची सोय केली. पत्की गुरूजी हे समाजवादी, राष्ट्रसेवा दलाचे काम करायचे. त्यामुळे गोविंद पानसरे सेवादल सैनिक झाले. राहुरीच्या शाळेतून ते अहमदनगरच्या सोसायटी हायस्कूलमध्ये दाखल झाले आणि ते एस.एस.सी. फर्स्ट क्लासमध्ये पास झाले. खरं म्हणजे १९५० च्या दरम्यान एस.एस.सी. पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना सहज सरकारी नोकरी मिळत होती. गोर्विद पानसरे तर फर्स्ट क्लासवाले होते. सरकारी नोकरी चालून आली असती पण नोकरीच्या फंदात न पडता पत्की गुरूजींच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कोल्हापूर गाठले.

शिक्षणाची संधी नाकारलेल्या बहुजनांच्या पोरांसाठी राजर्षी शाहूंनी कोल्हापुरात अनेक वसतिगृहे सुरू केली होती. त्या वसतिगृहात प्रवेश मिळेल म्हणून गोविंद पानसरे कोल्हापुरात आले. पण जरा उशीर झाला होता. त्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही. बोर्डिंगचे सुपरिटेंडेंट मामासाहेब मिणचेकर यांची भेट घेतली. त्यांनी पुढच्या वर्षी प्रवेश देण्याची हमी घेतली. मग त्यावर्षी गोविंद पानसरेंनी आसरा घेतला तो बिंदू चौकाचाच. बिंदू चौकात एक पुस्तकाचं दुकान होतं. दुकान म्हणजे एक खोकं होतं. त्या खोक्याच्या समोरच्या फळीचा गोविंद पानसरेंनी चांगला वापर

करून घेतला. त्या पुस्तक दुकानाचं नावच Republic Book Stall असं होतं. ते नेमकं बिंदू चौकातल्या महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याशेजारीच होतं. त्या पुतळ्याशेजारी पानसरेंनी आपली पथारी टाकली. सकाळी उठून कोटीतीर्थावर जाऊन आंघोळ करायची. दिवसभर पेपर टाकण्यापासून इतर कष्टाची कामे करायची. कॉलेजला जायचं असा दिनक्रम सुरू केला.

पत्की गुरुजीही राहुरी सोडून गावाकडे आले होते. त्यांच्याकडून गोविंद पानसरेंचा आचार्य शांताराम गरूड यांच्याशी परिचय झाला. मग पानसरे समाजवादी पक्षातीलच क्रांतिकारी समाजवादी पक्षात काम करायला लागले. आणि १९५२ पासून ते पूर्णतः कम्युनिस्ट पार्टीचे सदस्य झाले. ते अखेरपर्यंत त्याच पक्षात राहिले. कोल्हापुरात आल्यावर कसंबसं एक वर्ष त्यांनी काढलं. दुसऱ्या वर्षी त्यांना राजर्षी शाहूंच्या प्रिन्स शिवाजी विद्यार्थी वसतिगृहात प्रवेश मिळाला. मग शिक्षण अर्थाजन आणि चळवळ या तीनही बाबी एकाच वेळी सुरू झाल्या. मुळात गरीब कुटुंबातून आल्यामुळे लोक ज्या बिकट परिस्थितीत राहतात त्यात बदल झाला पाहिजे हे त्यांना मनातूनच वाटत होते. म्हणून त्यांनी परिवर्तनाची चळवळ आणि त्यासाठीच संघर्ष करायचा निर्धार केला. वाळलेली लाकडंच लवकर पेट घेतात, ओली लाकडं पेटत नाहीत त्यामुळे या वाळलेल्या लाकडानेच पेट घेतला. आणि शेवटपर्यंत ते धगधगतच राहिले.

गोविंद पानसरे ज्यावेळी प्रिन्स शिवाजी विद्यार्थी वसतिगृहात राहून शिक्षण घेत होते, त्यावेळी गोवा मुक्ती लढ्याची ठिणगी पेटली. गोविंद पानसरेंनी लढ्यात सहभागी व्हायचा निर्णय घेतला. हायकोर्टाचे सेवानिवृत्त न्यायाधीश नामदार व्ही.जी. चव्हाण त्यावेळी बोर्डिंगचे सुपरिंटेंडेंट होते. त्यांच्या कानावर ही गोष्ट गेली. त्यांना गोविंद पानसरेंना बोलावून घेतलं. म्हणाले, "तू अजून शिकतो आहेस. पहिल्यांदा शिक्षण पूर्ण कर नंतर आंदोलन करत बस." त्यावर गोविंद पानसरेंनी दिलेलं उत्तर अत्यंत मार्मिक होतं. ते म्हणाले, "सर जो उद्या त्याग करीन म्हणतो, तो कधीच त्याग करत नाही." तरुण विद्यार्थ्याचं हे बाणेदार उत्तर ऐकून चव्हाण सरांचा नूरच पालटला. त्यांनी पानसरेंना चळवळीत भाग घेण्यासाठी जाण्याची मुभा दिली. बोर्डिंगमधील बरेच विद्यार्थी त्यांना निरोप द्यायला रेल्वेस्टेशवर गेले. परिवर्तनवादी चळवळी करतच त्यांनी राजाराम महाविद्यालयातून बी.ए. पर्यंतचं शिक्षण घेतलं.

गोविंद पानसरेंनी महापालिकेत शिपायाची नोकरी केली. नंतर प्राथमिक शिक्षकही झाले. अशा नोकऱ्या करत करतच त्यांनी शहाजी लॉ कॉलेजमधून वकिलीचे शिक्षण पूर्ण केले. मास्तरकीचा राजीनामा दिला. १९६४ साली वकिलीची

सनद घेतली. गोरगरिबांना हक्काचा, कमी पैशातला आणि खात्रीचा वकील मिळाला. वकिली म्हणजे खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं करणारा हिकमती माणूस असा एक खोटा प्रचार हितसंबंध दुखावलेल्यांनी केला आहे. हा समज कॉ. पानसरेंनी ५० वर्षाच्या वकिलीच्या कारकिर्दीतून खोटा असल्याचे सप्रमाण शाबित केले. अन्यायग्रस्तांना, शोषितांना न्याय मिळवून देणारा आणि शोषकांना चपराक देणारा वकील अशी आपली प्रतिमा तयार केली. कायमपणे समाजातल्या दुर्बल घटकांचीच त्यांनी बाजू मांडली. आपल्या बुद्धीचा वापर त्यांनी शोषित, पिडित, वंचित, उपेक्षित घटकांसाठी केला. बुद्धीचा कधीच बाजार मांडला नाही. वकिली सुरू करण्यापूर्वीच त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे काम सुरू केले होते. बिंदूचौकात पक्षाचे ऑफिसही थाटले होते. काम जोरात सुरू असतानाच १९६२ चे भारत-चीन युद्ध सुरू झाले. समस्त कम्युनिस्टांना चीनधार्जिणे आणि देशद्रोही ठरवून सरकारने तुरुंगात टाकले. त्यात कॉ. पानसरेंनाही तुरुंगात डांबले. कोल्हापूरमधील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात कुणी फिरकेनासे झाले. कार्यालय ओस पडले. हिंदूराव गोंधळी नावाचा एक कार्यकर्ता होता. तो एकटाच ऑफिस उघडायचा आणि चक्क गॅलरीत येऊन थांबायचा. पार्टीचं ऑफिस सुरू आहे असं दाखविण्यासाठीच तो गॅलरीत उभा असायचा. हिंदूराव गोंधळींना लिहिता वाचता येत नव्हतं. ते काय मार्क्सवादाचे अभ्यासक नव्हते. त्यानं कधी कुठलं तत्त्वज्ञान वाचलं नव्हतं तरीही त्याला मार्क्सवादी तत्त्वज्ञान कळलेलं होतं. म्हणून तर कॉ. पानसरे म्हणायचे की, 'ज्याला जगणं कळतं त्याला तत्त्वज्ञान कळतं.' १९६२ च्या युद्ध समाप्तीनंतर कॉ. पानसरेंची सुटका झाली. पूर्ववत ते चळवळीत सामील झाले. वेगवेगळ्या आंदोलनात, मोर्चात, चळवळीत त्यांना अनेकवेळा तुरुगांत जावं लागलं. ते ज्या कोर्टात वकिली करायचे तिथल्या न्यायाधीशांनाही पानसरेंच्या या तुरुंगवाऱ्या परिचित होत्या. त्यांच्या नावाचा पुकारा केल्यानंतर जर ते लगेच कोर्टात आले नाहीत तर काही न्यायाधीश त्यांच्या पक्षकारांना 'तुझे वकील तुरुंगात आहेत का बाहेर आहेत?' असे प्रांजळपणे विचारत असत. जर तुरुंगात असतील तर तारीख देऊन त्या पक्षकारांना रिकामं करत असत. कॉ. पानसरेंनी तुरुंगाचाही वापर माणसं जोडण्यासाठी आणि ज्ञान वाढविण्यासाठीच केला. ते नेहमी म्हणायचे, "माणसाच्या आयुष्यात दोनच ठिकाणी म्हणजे एक वसतिगृहात व दुसरे तुरुंगातच चांगले मित्र भेटतात."

कॉ. पानसरे कम्युनिस्ट होते म्हणजे नक्की काय होते, तर ते फक्त मार्क्सवाद सांगत नव्हते तर तो आचरणात आणत होते. तत्त्वज्ञानावर आधारलेलं आणि त्यास कृतीची जोड देणारं त्याचं आचरण होतं. ते बोलके नव्हते तर कर्ते समाजसुधारक

होते. कॉ. पानसरे ज्या ठिकाणी राहत होते त्यांच्यासमोर एक शाळेचे मोठे पटांगण होते. कालांतराने त्या पटांगणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा भरायला लागली. कॉ. पानसरेंचा मुलगा अविनाश हा अजाणतेपणे तिथे जाऊ लागला. त्याला दरडावून तिकडं जाण्यास मज्जाव करणं कॉ. पानसरेंना शक्य होतं. पण त्यांनी तसं केलं नाही. त्यांनी अविनाशला एक फुटबॉल घेऊन दिला. त्यांनी आपले मित्र गोळा केले. जिथं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा भरायची तिथं पोरं फुटबॉल खेळू लागली. त्यांच्या बौद्धिकापेक्षा फुटबॉलचा खेळ नक्कीच पोरांच्या आवडीचा झाल्याने त्यांची शाखा आपोआपच बंद झाली. अविनाशने इंजिनिअर व्हावं अशी कॉ. पानसरेंची मनोमन इच्छा होती. परंतु अविनाश इंजिनिअर न होता वकील झाला. कॉ. पानसरेंच्यावरची संघटनात्मक बांधणी, आंदोलनं, मोर्चे, कोर्ट केसेसची जवळजवळ सर्व जबाबदारी अविनाशनं आपल्या शिरावर घेतली. कॉ. गोविंद पानसरेंना त्यांच्या लिखाणाला सामाजिक व राजकीय कार्याला जादा वेळ देणं शक्य झालं. पण अविनाशच्या अकाली मृत्यूनं त्यांना परत कोर्ट केसेस आणि सामाजिक संघटन यात अडकून पडावं लागलं. नेमकं याच काळात त्यांची दृष्टी अधू झाली. एकुलत्या एक मुलाचा अकाली मृत्यू, वृद्धत्व, दृष्टिदोष या सर्व बाबी खच्चीकरणास पुरेशा होत्या, पण कॉ. पानसरे खचणारे नव्हते. वास्तव स्वीकारण्याची त्यांची तयारी होती. काळजावर दगड ठेवून दुःखाचे जाहीर प्रदर्शन न करता हा कणखर बाप एकांतात जाऊन ढसाढसा रडला. बाहेर येऊन कुटुंबियांना वास्तव स्वीकारायचे आवाहन केले.

अविनाशच्या मृत्यूनंतर कॉ. गोविंद पानसरेंनी बिंदू चौकातील रेड फ्लॅग इमारतीजवळ अंत्ययात्रा आल्यानंतर मुठी आवळून "कॉ. अवि पानसरे का अधुरा काम कौन करेगा?" अशी घोषणा दिली. तिथंच कम्युनिस्ट होणं म्हणजे नक्की काय असतं याचं उत्तर मिळालं. विविध शिबीरात व अभ्यास वर्गात कॉ. पानसरे हे कम्युनिस्ट होणं स्वतःच्या पलीकडं (Beyond Self) होणं असं सांगायचे. ते कृतीशील होते, हे त्यावेळी कळलं. राजर्षी शाहू महाराजांचा दुसरा मुलगा प्रिन्स शिवाजी अकाली गेल्यानंतर राजर्षींना शोक अनावर झाला. त्यावेळी त्यांचे दिवाण श्री सबनीस म्हणाले होते की, "राजानं कधी रडायचं नसतं" श्री. बापूसाहेब पाटील, कॉ. अधिकारी यांनाही मुलाच्या अकाली जाण्याचा धक्का बसला होता. त्यांनी तो समर्थपणे पेलला. राष्ट्रसंत गाडगेबांबांना तर कीर्तन सुरू असतानाच मुलाच्या मृत्युची बातमी कळली होती. परंतु त्यांनी कीर्तन थांबविले नव्हते. या सर्वांचा प्रभाव म्हणून कॉ. पानसरेंनी मुलाच्या मृत्युचं दुःख पचवलं. गावोगावच्या तरुण कार्यकर्त्यांतच कॉ.

पानसरेंनी अविनाश पाहिला. राजाप्रमाणंच नेत्यानं कधी रडायचं नसतं तर सातत्यानं लढायचं असतं हेच कॉ. पानसरेंनी दाखवून दिलं.

कॉ. गोविंद पानसरे हे स्वातंत्र्यसैनिक होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी भागीदारी केली नव्हती. पण गोवा पोर्तुगीजांच्या तावडीतून सोडविण्यासाठी त्यांनी विद्यार्थी दशेतच संघर्ष केला. संघर्ष यशस्वी झाला. सरकारने त्यांना स्वातंत्र्य सैनिकाची पेन्शनही दिली. मात्र या पेन्शनचा वापर त्यांनी व्यवस्था बदलासाठीच्या लढ्यासाठीच केला. भाषावार प्रांतरचनेच्या नावाखाली मराठी भाषिक माणसं जी महाराष्ट्रात येण्यासाठी आसुसलेली होती, त्यांच्यासाठी जी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी राहिली, त्या समितीच्या सेक्रेटरी पदाची धुरा कॉ. पानसरेंनी सांभाळली होती. कॉ. पानसरेंनी जशा रस्त्यावरच्या लढाया केल्या तरी संसदीय राजकारणातही मागे राहिले नाहीत. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना वॉर्डावॉर्डामधून उमेदवाऱ्या देऊन निवडणुकांचा धडाक्यात प्रचार केला. तसेच स्वतःही विधानसभेच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरले. निवडणुकीच्या राजकारणात त्यांना लौकिक अर्थाने यश आले नाही असे जरी असले तरी मूल्याधिष्ठित राजकारणाचा सैद्धांतिक व वैचारिक बैठकीचा त्यांचा आग्रह राजकारण्यांना बरेच काही शिकवून गेला.

कॉ. गोविंद पानसरे हे सिद्धहस्त लेखक होते. त्यांचे काम फक्त कामगार चळवळ आणि राजकारण एवढ्यापुरते मर्यादित नव्हते तर ते जीवनातील परिवर्तनाच्या सर्व पैलूंना स्पर्श करणारे होते. तसेच त्यांचे लिखाणही सर्वव्यापी होते. त्यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, कायदेविषयक, ऐतिहासिक, धार्मिक इ. विषयावर वास्तववादी व रोखठोक लेखन केले. 'शिवाजी कोण होता' आणि 'राजर्षी शाहू : वसा आणि वारसा' ही त्यांची दोनच ऐतिहासिक पुस्तके. छत्रपती शिवाजी महारांजावर हजारो पानांच्या बखरी, शिवचरित्र, कथा, कांदबऱ्या, नाटकं, पोवाडे इ. सर्व साहित्य प्रकारातील साहित्य एका बाजूला उपलब्ध आणि दुसऱ्या बाजूला केवळ पन्नास पानांची शिवाजी कोण होता? ही पुस्तिका. हजारो पानांच्या विविध साहित्य कृतींना सडेतोड उत्तरे देणारी ठरली. कवी कल्पनांच्या घोडावर स्वार होऊन ज्यांनी रंजक इतिहास लिहिला, त्या सर्वांचा फोलपणा कॉ. पानसरेंनी वास्तववादी पुस्तिकेतून जगासमोर आणला. त्याचे अनेक भाषांत भाषांतरही झाले. जी अवस्था शिवरायांची तीच अवस्था राजर्षी शाहूंची. ब्राह्मणी भांडवली इतिहासकारांनी फक्त राजर्षी शाहूंची गॉसिपच्या माध्यमातून बदनामीच केली होती व आहे. मात्र कॉ पानसरेंच्या 'राजर्षी शाहू : वसा आणि वारसा' या पुस्तकाने मात्र राजर्षींचे सामाजिक समतेचे विचार वाचकांपुढे आले. जी अवस्था ऐतिहासिक पुस्तकांची तीच अवस्था

सामाजिक समतेच्या पुस्तकांची. सच्चर समिती व मागासलेले मुस्लिम, मुस्लिमांचे लाड, अजूनही न स्वीकारलेला मंडल आयोग ही सामाजिक विषयावर पुस्तके त्यांनी लिहिली. कामगार कायद्याची तोंड ओळख, ३७० कलमाची कुळकथा ही कायद्यावर व राज्यघटनेतील काश्मीरविषयक कलमावर त्यांनी पुस्तके लिहिली. मुक्त अर्थव्यवस्था, डंकेल प्रस्ताव, शेती धोरण याही विषयावर त्यांनी लिखाण केले. सामान्य माणसाचा जगण्याशी संबंध येणारी जी जी क्षेत्रे आहेत त्या त्या सर्वच क्षेत्रात कॉ पानसरेंनी लिखाण केले आहे. एकाचवेळी ते इतिहासतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कायदेपंडित, अर्थशास्त्रज्ञ व धर्मचिकित्सक या सर्वच भूमिकात असलेले दिसतात.

जगातल्या तत्त्ववेत्यांनी व विचारवंतांनी जगाचा अर्थ सांगितला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार बदल हा जगाचा नियम आहे. प्रश्न आहे तो जग बदलण्याचा. त्यासाठीच परिवर्तनवादी व पुरोगामी चळवळीची गरज आहे, असं अत्यंत प्रभावीपणे आग्रहपूर्वक प्रतिपादन कॉ. गोविंद पानसरे करीत असत. खरं म्हणजे परिवर्तनाची गरज कोणाला असते. कॉ. पानसरे म्हणायचे, "ज्याचं बरं चाललं आहे. त्याला परिवर्तनाची गरज नसते. पण ज्याचं बरं चाललेले नाही त्यांनाच परिवर्तनाची गरज असते." ज्याच्या पोटात दुखतं तोच ओवा मागतो हे वास्तव आहे. कॉ. पानसरे यांनी प्रामुख्यानं कामगारांच्या चळवळी चालवल्या. त्यांनी केवळ एकाच ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांचे संघटन केले असे नाही तर विखुरलेल्या एकेकट्या कामगारांबरोबर छोटा मोठा स्वतःचा धंदा करणाऱ्यांचीही संघटना बांधली व त्यांना परिवर्तनाच्या लढ्यात उतरविले. बँका, एल.आय.सी., प्राध्यापक-शिक्षक, इंजिनिअरींग इंडस्ट्रीज, साखर कारखाने, एस.टी., एम.एस.ई.बी., सहकारी संस्था आदी ठिकाणच्या कामगार कर्मचाऱ्यांची त्यांनी वज्रमूठ बांधली. पण त्याचबरोबर त्यांनी असंघटित, असंरक्षित अशा मागास घटकांची चळवळ उभी केली. त्यात प्रामुख्याने अंगणवाडी सेविका, शेतमजूर, घरकाम करणाऱ्या मोलकरीण महिला, बांधकाम कामगार यानाही संघटित केले. जे नोकरी करत नाहीत पण स्वतःचा छोटामोठा धंदा करणाऱ्यांच्या जीवनातही परिवर्तन व्हावे म्हणून त्यानां संघटित करून लढ्यात उतरविले. त्यात रिक्षा चालक, खोकेवाले, पथारीवाले आणि फेरीवाले यांच्या संघटनेचा समावेश होतो. कोणत्याही कायद्याचे संरक्षण नसणाऱ्यांना त्यांनी कायद्याच्या कक्षेत आणले.

कॉ. पानसरे यांनी केवळ कामगारांच्या व कम्युनिस्टांच्या चळवळी चालविल्या असे नाही. त्यांना फक्त कामगार पुढारी म्हणून सीमित करता येणार नाही. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांनी "कसेल त्याची जमीन" हा कायदा आणला.

त्यामुळे राबणाऱ्या बहुजनांना कुळाऐवजी जमीन मालकाचा दर्जा मिळाला. त्याचवेळी महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीत काम करणाऱ्यांनी जमिनीच्या फेरवाटपाची मागणी केली. त्यांनी "कसेल त्याची जमीन हे ठीक आहे पण नसेल त्याचे काय?" हा प्रश्न धसाला लावला. त्यात कॉ. पानसरे अग्रभागी होते. क्रांतिसिंह नाना पाटील आणि डॉ. आंबेडकरांचे सहकारी श्री. दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली कॉ. पानसरेंनी हे प्रभावी आंदोलन केले. १९६६ साली झालेल्या आंदोलनाचा अत्यंत वास्तववादी किस्सा कॉ. पानसरे सांगत असत. त्या आंदोलनाचं नाव होतं "जमीन बळकाव आंदोलन." भूमिहीनांनी बडा बागायतदारांच्या वा सरकारी मालकीच्या जमिनीत घुसून त्याचा प्रतिमालक कब्जा केल्याचे ते आंदोलन होते. त्यापैकी एक आंदोलन कोल्हापूर जिल्ह्यात झाले. सर्व आंदोलकांना पोलिसांनी अटक केली. त्यांना कोर्टासमोर आणले. आंदोलकांनी "होयच! आम्ही सरकारी/बड्या बागायतदारांची जमीन ताब्यात घेतली आहे." हा गुन्हा कबूल केला. कोर्टानी कॉ. पानसरेंसह सर्व आंदोलकांना आठ दिवसांची शिक्षा दिली. शिक्षा भोगून आठ दिवसांनी सर्वजण बाहेर आले आणि तसेच जमीन बळकाव आंदोलन सातारा जिल्ह्यात कराड येथे केले. आंदोलकांनी जमिनीत घुसून प्रतिकात्मक कब्जा घेतला. पोलिसांनी त्यांना अटक केली. कोर्टासमोर आणले. आंदोलकानी कोल्हापूरप्रमाणेच गुन्हा कबूल केला. कोर्टाने सर्व आंदोलकांना संध्याकाळी साडेपाच वाजता शिक्षा ठोठावली. ती होती कोर्ट उठेपर्यंत शिक्षा. कोर्टानी शिक्षा सुनावली व पाचच मिनिटात कोर्ट उठून गेलं. आंदोलकांची शिक्षा संपली. दोन कोर्टांनी एकाच गुन्ह्याखाली दोन वेगवेगळ्या शिक्षा कशा व का दिल्या याचं संशोधनच कॉ. पानसरेंनी केले. ते असं होतं की, कोल्हापूर मधले मॅजिस्ट्रेट ज्यानं आठ दिवसाची शिक्षा दिली होती. त्यांच्या वडीलांची जमीन कूळ कायद्यात गेली होती. आणि ज्यांनी कोर्ट उठेपर्यंत शिक्षा दिली त्यांच्या वडिलांना कूळ कायद्याने जमीन मिळाली होती. या दोन मॅजिस्ट्रेटच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा संदर्भ या ठिकाणी महत्त्वाचा होता.

कॉ. पानसरे देववादी अगर दैववादी नव्हते. मात्र पौराणिक ग्रंथापासून ते संत वाङ्मयापर्यंत त्यांचा अभ्यास होता. ते उत्तम साहित्यिक होते. अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलनाचे ते जनक होते. कॉ. पानसरेंनी स्वतःचे असे शब्द प्रचारात आणले. अनेक शब्दांची त्यानी निर्मिती केली. उदाहरणार्थ "लढ्याची रणनीती", "शत्रू मित्र विवेक", "रेषेच्या अलीकडचे आणि रेषेच्या पलीकडचे", "शाहूंच्या विचारांची आजची प्रस्तुतता", "जॉबलेस ग्रोथ" असे अनेक शब्द त्यांनी मराठी भाषेत नव्याने आणले. विचारावरची त्यांची निष्ठा अढळ होती. ते पोथीनिष्ठ कम्युनिस्ट नव्हते.

मार्क्सवाद आणि फुले, शाहू, आंबेडकरवाद एकाचवेळी अंगिकारला पाहिजे या मताचे होते.

कामगार कष्टकऱ्यांच्या आर्थिक परिवर्तनाबरोबरच त्यांचे सामाजिक परिवर्तन झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. भारतीय समाजव्यवस्था जाती धर्माच्या घट्ट चौकटीत आहे. जातीविहीन, वर्गविहीन आणि शासनविहीन समाज रचना येण्यासाठी दीर्घकालीन प्रक्रिया अवलंबावी लागेल या मतावर ते ठाम होते. अशी आदर्श व्यवस्था काय आपसूक येणार नाही. त्यासाठी दीर्घकालीन प्रयत्नांची गरज आहे. जातीविहीन समाज रचनेसाठी आंतरजातीय विवाह हाच एकमेव मार्ग असल्याने त्यांनी आंतरजातीय विवाह केंद्रे उभारली. शेकडो तरुण-तरुणींचे आंतरजातीय विवाह त्यांनी लावून दिले. अशा विवाहांना कायम पाठबळ दिले. स्वतःच्या मुला मुलींचेही आंतरजातीय विवाह केले.

सामाजिक प्रश्नावर लढताना त्यांच्या नेतृत्वाचा कस लागला तो युती शासनाच्या काळात. धर्मरक्षणाच्या ठेकेदारांनी विश्वशांती यज्ञाचा घाट घातला. तोही कोल्हापूरसारख्या पुरोगामी शहरात. त्यावेळी त्यांनी समाजातील सर्व थरातील लोकांना यज्ञविरोधी चळवळीत आणले. वर्गलढा करणारे साम्यवादी नेते लौकिक अर्थाने तसे सरंजामशाहीच्या विरोधातच. पण विश्वशांती यज्ञास नेटाने विरोध करण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष कोल्हापूरच्या शाहू महाराजांचीही भेट घेऊन त्यांना विश्वशांती यज्ञ हे कसे थोतांड आहे, राजर्षी शाहूंच्या पुरोगामी विचारांच्या घड्याळाचे काटे उलट्या दिशेने फिरविणारे आहे हे पटवून दिले आणि म्हणूनच यज्ञविरोधी आंदोलनात शाहू महाराजही सहभागी झाले. कॉ. पानसरेंच्या कोल्हापूरातील एकूण पासष्ट वर्षाच्या वास्तव्यात ते एकदाच करवीरच्या राजवाड्यात गेले आणि शाहू राजांचा चळवळीस सहभाग मिळविला.

कॉ. पानसरेंची वैचारिकतेची कसोटी पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन केंद्रावर झालेल्या हल्यानंतर कोल्हापूरच्या निषेध सभेत लागली. जेम्स लेनने छत्रपती शिवराय व जिजाऊ माँसाहेब यांच्या विषयी बदनामीकारक लिखाण केले. त्या जेम्स लेनला खोटी व चुकीची माहिती पुरविण्याचे काम येथील ब्राह्मणी भांडवलदारी विचारांच्या पाईकांनी केले होते. त्या बदनामीची स्वाभाविक प्रतिक्रिया म्हणूनच भांडारकर भट अड्डावर हल्ला झाला. त्याची निषेध सभा कोल्हापूरात झाली त्यात कॉ. पानसरेंना भागीदारी करण्याचे निमंत्रण आयोजकांनी दिले. ते आपण स्वीकारताना त्यांनी प्रथम जेम्स लेनचा निषेध, मग भांडारकरवरील हल्याचा निषेध करण्याची सूचना केली. ती आयोजकांनी मान्य केली. निषेधाची मोठी सभा झाली.

पण वक्त्यांचा भर जेम्स लेनच्या निषेधावर राहिला. त्याची स्वाभाविकच प्रतिक्रिया म्हणून भांडारकर हल्ल्याचा उल्लेख सर्वांनीच केला. शिवाजी महाराज व जिजाऊ यांची बदनामी ही क्रिया व भांडारकर संस्थेवरील हल्ला ही प्रतिक्रिया हे सिद्ध केले.

कॉ. पानसरे यांचे शाहू विचारांवरचे प्रेम सर्वश्रुत होते. त्यांनी शाहू राजांच्या पुरोगामी विचारावर जसे लेखन केले तसेच शाहू विचार लोकांपर्यंत जावे म्हणून त्यांनी शाहू राजांच्यावर शंभर व्याख्याने व तीही तरुणांच्या पुढंच असा संकल्प सोडला. त्यातली ८३ भाषणं त्यांनी पूर्ण केली. शेवटची दोन भाषणं त्यांनी मिरज येथील मिरज महाविद्यालयात व कन्या महाविद्यालय येथे २ फेब्रुवारी २०१५ ला दिली व १६ फेब्रुवारी रोजी त्यांच्यावर हल्ला झाला. महाराष्ट्राच्या विधान भवनात आणि संसदेच्या प्रांगणात राजर्षी शाहूंचा पुतळा उभा करावा यासाठी जे प्रयत्न, पाठपुरावा झाला, त्यात कॉ. गोविंद पानसरे आघाडीवर होते. त्यात त्यांची भागीदारी मोठी होती.

अस्पृश्यता निवारणाचा एक भाग म्हणून राजर्षि शाहू महाराज हे कोल्हापुरात गंगाराम कांबळेच्या छोट्याशा हॉटेलात चहा पीत असत. त्या गंगाराम कांबळेचे हॉटेल ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणी गंगाराम कांबळेचा स्मृतिस्तंभ उभारण्यात कॉ. पानसरेंनी पुढाकार घेतला. तो स्मृतिस्तंभ अव्याहतपणे राजर्षि शाहूंचे कार्य व समतेचा संदेश देत राहील. कॉ. पानसरेंनी समाजाचे विविध अंगांनी प्रबोधन केले. आचार्य शांताराम गरुड यांच्या इचलकरंजीच्या समाजवादी प्रबोधिनीत त्यांचा सहभाग स्थापनेपासूनच होता. आचार्य शांताराम गरुड त्यांना 'प्रबोधक पानसरे' म्हणत.

कॉ. पानसरे कार्यकर्त्यांना सन्मान देत असत. कार्यकर्त्यांवर त्यांनी जिवापाड प्रेम केले. २००८ मध्ये कॉ. पानसरेंना ७५ वर्षे पूर्ण झाली. लोकांनी पंच्याहत्तरीचा आग्रह धरला. पण पानसरेंनी अगोदर सामान्य कार्यकर्त्यांची चरित्रे प्रकाशित करायची, मगच आपली पंचाहत्तरी करायची असा आग्रह धरला आणि शेकडो कार्यकर्त्यांची चरित्रे प्रकाशित करूनच पंच्याहत्तरीचा कार्यक्रम केला. त्यात दोन वर्षे गेली. वयाच्या ७७ वर्षानंतर पंचाहत्तरी केली.

आयुष्यभर कॉ. पानसरे हे वास्तवच जगले. कधीही त्यांचे पाय जमिनीवरून हवेत गेले नाहीत. त्यांच्या जन्मगावी जर कोणास नेण्याचा प्रसंग आला तर त्यांचे आईवडील ज्या पुलाच्या बांधकामावर मजुरी करत होते तो पुल ते संबंधिताना अभिमानानं दाखवत असत. ही होती त्यांच्या जगण्यातली वास्तवता.

४.
मी हिंदू नाही, मी लिंगायत आहे.
मी लिंगायत आहे, मी द्रविड आहे.

– प्रा. डॉ. एम. एम. कलबुर्गी

३० ऑगस्ट २०१५ रोजी सकाळी ८ वा. ४५ मि. कर्नाटकातील धारवाड येथे हम्पी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मल्लेशप्पा मडीवाळप्पा कलबुर्गी यांचा त्यांच्या राहत्या घरी दोघा अज्ञातांनी खून केला, अशी बातमी देशभरच्या वृत्तवाहिन्यांवर एकसाथ झळकली. केवळ कर्नाटकच नव्हे तर संपूर्ण देशभर एकच खळबळ माजली. फारसे राजकीय किंवा सामाजिक कार्यक्षेत्रात परिचित नसलेले हे डॉ. कलबुर्गी कोण याबद्दल कुतूहल आणि त्यांच्याबद्दलची चर्चाही सुरू झाली. कोणी मारलं यापेक्षा का मारलं? याचीच उत्सुकता यासर्व चर्चेमध्ये होती. कारण सर्वसाधारणपणे राजकारणी माणसाच्या हत्येला राजकीय खून समजण्याचा समज रुढ आहे आणि राजकारणाची प्राथमिक आणि भाबडी ओळख असणाऱ्या सर्वसामान्यांसाठी डॉ. कलबुर्गी कसलं राजकारण करत होते हे गूढच होतं. पण त्याहीपेक्षा या देशातील बहुतांश विचारवंत समजणाऱ्या विद्वानांमध्ये आणि राजकीय कार्यकर्त्यांमध्येदेखील कलबुर्गींच्या विषयी असेच काहीसे भाबडे समज होते. कारण डॉ. नरेंद्र दाभोळकर ज्यांच्याशी लढत होते त्यांचा एक चेहरा मठाधीश महंत, बुवांच्या रुपाने समोर होता. तर कॉ. पानसरे यांचे भांडवलदार आणि त्यांची तळी उचलणारे तथाकथित ब्राह्मणी इतिहासकार हे त्याच शत्रूचा आणखी एक चेहरा सर्वांना परिचित होता. पण डॉ. कलबुर्गींच्या बाबतीत मात्र शत्रूचा चेहरा खूपच धूसर होता. त्यामुळे वरवर अजातशत्रू वाटणाऱ्या डॉ. कलबुर्गींच्या जिवावर कोण उठले असेल याची काही जणांना कल्पना असली तरी बहुतांशांच्या मनात त्याबद्दल डॉक्टरांच्या हत्येपर्यंत खूपच अज्ञान असावे आणि आजही ते फारसे दूर झाल्याचे दिसत नाही. या पार्श्वभूमीवर डॉ. कलबुर्गींचे व्यक्तिगत चरित्र आणि काम थोडक्यात का होईना समजून घेणे आवश्यक आहे.

२८ नोव्हेंबर १९३८ रोजी कर्नाटकातील (तत्कालीन बॉम्बे प्रेसिडेन्सी व आताच्या विजापूर जिल्ह्यातील) सिंदगी तालुक्यातील गुब्बेवाड येथे डॉ. कलबुर्गी यांचा जन्म झाला. वडील मडीवाळप्पा आणि आई गौरम्मा हे परंपरेने जन्मजात शेतकरी आणि या देशातील शेतकऱ्यांना लाभलेले परंपरागत दारिद्र्य त्यांच्याही

वाट्याला आलेले. पण पारंपरिक धर्मश्रद्धा आणि नैतिकता कट्टरतेने जोपासून जगणारे ज्याला आपल्या देशात 'धार्मिक वृत्तीने राहणारे' असे संबोधले जाते तसे हे कुटुंबही कडवे धर्मनिष्ठ. पुढे जाऊन डॉ. कलबुर्गींनी ज्या आपल्या धर्माच्या शुद्धीकरणाची मोहीम हाती घेतली त्या लिंगायत धर्माचे. बसवण्णा व त्यांच्या शरण सहकाऱ्यांनी ब्राह्मणी धर्माच्या विरोधात उभ्या केलेल्या लिंगायत धर्माचे जेव्हा पुढे 'वीरशैव' नावाखाली ब्राह्मणीकरण होत गेले. खुद्द डॉ. एम.एम. कलबुर्गी देखील या ब्राह्मणीकरण झालेल्या 'वीरशैव' परंपरेच्या प्रभावाखाली खूप काळापर्यंत होते. पण स्वतःच केलेल्या संशोधन कार्यातून त्यांना लिंगायत धर्माचे मूळ स्वरूप सापडले. शरणांच्या वचन साहित्यांचा अभ्यास करताना बसवण्णा स्थापित लिंगायत धर्म वेगळा आहे आणि त्याचा पंचाचार्य घोषित 'वीरशैव' धर्माशी कसलाही संबंध नाही हे त्यांच्या लक्षात आले. किंबहुना पंचाचार्य आणि त्यांचा 'वीरशैव' धर्म या पोकळ गोष्टी आहेत. मूळ लिंगायत धर्माशी तुलना करता त्यांना कोणताच भौतिक आधार व पाया नाही हे त्यांना स्पष्ट झाले. संशोधकाची एक सत्यान्वेशी वृत्ती आणि शिस्त त्यांच्या अंगी इतकी बाणली होती की, त्यांनी स्वतःच 'मार्ग खंड १' मधील 'मार्ग के मोदलू' ह्या पुस्तकाच्या प्रथमावृत्ती २८ नोव्हेंबर १९८८ च्या प्रस्तावनेमध्ये म्हटले आहे.

"...भारतासारख्या भावनिष्ठ राष्ट्रात संशोधन म्हणजे सरळ सुलभ मार्ग नव्हे. 'कटू सत्य सांगू नये' असे सांगणाऱ्या संप्रदायाचे वारसदार असलेल्या भारतीयांना असे सत्य सहजासहजी पचनी पडत नाही, मधुर वाटत नाही. त्यामुळे या देशात संशोधकांना वेळोवेळी लहान-सान सुळावर चढावेच लागते. आज 'शहाणे' म्हणवून घेणारे, 'जाणकार' म्हणून घेणारेच 'अजाण', 'मुग्ध' जनांचा वापर करून संशोधकांचा म्हणजे सत्याचा घात करण्यामध्ये तृप्ती मिळवित आहेत. अशा प्रसंगामुळेच भारतातील संशोधकांना अनेक अग्निकुंडे पार करावी लागतात. कर्नाटकच्या संदर्भात बोलायचे झाले तर बहुधा माझ्या पिढीतील इतर संशोधकांपेक्षा माझ्या पायाखाली पसरलेली अग्निकुंडे अधिक मोठी, दाहक असल्याचे दिसून येते. तथापि पायाखालील निखाऱ्यांपेक्षा नेत्रांपुढील प्रकाश महान असतो, परम असतो. ही माझी धारणाच मला वाचवित आली आहे, माझं पोषण करीत आली आहे असं मी समजतो. संशोधकाने चुकीचे सांगितले असण्याची शक्यता असते, पण त्याने खोटे सांगितलेले नसते. कारण संशोधन म्हणजे अल्पविराम, अर्धविरामांच्या मार्गे पूर्णविरामाकडे मार्गरथ राहण्याची क्रिया असते. त्यामुळे नवनवीन संदर्भ स्त्रोतानुसार संशोधक आपल्या अभिप्रायात सुधारणा घडवित असतो. हे सगळे आदर्श माझ्या

मनाठायी बसवूनच मी संशोधन-लेखन करीत असतो हे विनम्रपणे नमूद करू इच्छितो.''

संशोधकाने आपल्या गृहीतकाच्या समर्थनाचा अटापिटा करणारे, वकिली डावपेच लढवायचे नसतात तर वास्तवाच्या शोधातून समोर येणाऱ्या सत्याला सामोरे जात स्वीकारायचे असते. याचे भान डॉ. कलबुर्गींना नेमके असल्याने परंपरेच्या ओझ्याखाली वाढूनही सत्याच्या जवळ आल्यावर त्यांना हे ओझे सहजपणे फेकून देणे शक्य झाले. निम्मे अधिक आयुष्य ते 'वीरशैव' प्रभावाखाली होते. या काळात त्यांनी ज्या विविध संशोधन संस्था उभ्या केल्या, त्यांच्या नावात 'वीरशैव' हा शब्द ते सहजपणे वापरत होते. पण जेव्हा 'वीरशैव' आणि लिंगायत यातील अंतर आणि विरोध लक्षात आल्यावर ते लिंगायत या शब्दाचे कट्टर समर्थक तर 'वीरशैव' या शब्दाचे अत्यंतिक विरोधक झाले. पर्यायाने 'वीरशैव' नावाची ब्राह्मणीकरणाची प्रक्रिया सुरू करणारे पंचाचार्याचेही ते एक कट्टर पण शास्त्रशुद्ध विरोधक झाले. यातूनच धर्मशुद्धीकरणाच्या २० व्या शतकातल्या एका महान चळवळीचा पाया घातला गेला. संशोधनातून निघालेल्या सत्याचा या चळवळीला आधार होता. या देशातील वैदिक आणि अवैदिक किंवा ब्राह्मणी-अब्राह्मणी अशा एका सनातन संघर्षाचा आजच्या काळातला हा उद्रेक होता असे म्हणता येईल. त्यामुळे जाणीवपूर्वक निर्माण न केलेल्या या चळवळीचे सद्यकालीन प्रणेते आपोआपच डॉ. एम.एम. कलबुर्गी ठरले. ब्राह्मणी धर्माच्या पकडीतून, विळख्यातून आणि गुलामगिरीतून एका अब्राह्मणी धर्माला सोडविण्याचा, मुक्त करण्याचा हा प्रयास होता. म्हणजे परंपरेने इथल्या कष्टकरी बहुजन स्त्री-पुरुषांना ब्राह्मणी धर्माच्या पुरोहितशाहीने आपल्या धर्माच्या नावाखाली चालविलेल्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचा एक व्यापक संघर्ष होता. पर्यायाने प्रा. कलबुर्गींनी थेट एका व्यापक जुलमी व्यवस्थेलाच आव्हान दिले होते. सद्यकाळात संपूर्ण भारतात एकमेव महाराष्ट्रात अशी घटना घडली आहे. संशोधनातून पुढे आलेल्या सत्याने चळवळीचे रूप घेणे आणि व्यवस्थेविरोधी संघर्ष मांडणे हे महाराष्ट्रात प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे सरांच्या अथक संशोधन श्रमातून घडले आहे. कलबुर्गी सरांसारखे डॉ. आ.ह. साळुंखे सारख्या व्यक्तींना, त्यांनीच शोधलेले सत्य चळवळीत कसे खेचते त्याची ही दोन बोलकी उदाहरणे आहेत. संशोधनकर्त्यांना संशोधन कशासाठी आणि त्यामध्ये सत्याचे स्थान कसे मोठे असते याचे भान देणारी आहेत. अर्थात ही सद्य काळातील दोन उदाहरणे असली तरी ती फार पूर्वीपासून आणि जगभर दिसून आलेली आहेत. चार्वाकापासून

सॉक्रेटिस, ख्रिस्त, बसवण्णा, ब्रुनो, कोपर्निकस, गांधी अशा अनेकांच्या हौतात्म्याची ही परंपरा आहे.

सिंदगीसारख्या छोट्याशा खेड्यात आपले शिक्षण संपवून कलबुर्गी सर यांनी विजापूर येथे आपले महाविद्यालयीन शिक्षण घेतले. पदव्युत्तर शिक्षण धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठात घेऊन पुढे बराच काळ ते कर्नाटक महाविद्यालय आणि कर्नाटक विद्यापीठात कार्यरत राहिले. कन्नड आणि इतिहास हे त्यांचे आस्थेचे आणि अभ्यासाचे विषय होते. त्यांच्यातल्या निर्मितीक्षम, कवी आणि नाटककाराला इतिहास विषयाने सत्यान्वेशी संशोधकवृत्ती पुरविली. पण संशोधकाला लागणाऱ्या चिकाटी, परिश्रम आणि वेळेची अमर्यादता यामुळे त्यांच्याकडून साहित्यनिर्मिती कमी झाली असली तरी जवळपास ६५ च्यावर इतिहासातील आणि साहित्यातील समस्या वाटणाऱ्या कूट विषयांवरची त्यांनी उकल करण्याचा जो काय महाकाय प्रयास केला आहे त्याला तोड नाही आणि एकूणच कन्नड क्षेत्रावर आणि भारतीय सांस्कृतिक क्षेत्रावर त्यांनी हिमालयाएवढे उपकार करून ठेवले आहेत. त्यांच्या संशोधनाने तथाकथित संशोधकांची आणि प्रस्थापित व्यवस्थेची तळी उचलणाऱ्या भाटांची त्यांनी पंचाईत करून ठेवली आहे. तरीही संशोधकांची कालमर्यादा ते चांगलीच ओळखून होते. संशोधकाचे कार्य किंवा त्यांनी शोधलेले सत्य हे कधीच अंतिम नसते. संशोधकाच्या भौतिक शरीराच्या मर्यादेत ते अर्धविरामासारखे असून ते मागून येणाऱ्याला पुढे मार्गस्थ होण्यासाठी दिशादर्शक असते, असे ते नम्रपणे सांगत होते. त्यांच्या संशोधनाने त्यांचे व्यक्तिगत आणि कौटुंबिक आयुष्य हे नेहमीच असुरक्षित आणि धोक्यात येत राहिले होते. ते होणार याची त्यांना फार पूर्वीच खात्री होती व तसे ते बोलून दाखवतही. तसाच त्यांचा अंत झाला. पण सत्याची निष्ठा माणसाला निर्भीड बनविते. स्वतःच्या इप्सित ध्येयापुढे स्वतःचे आयुष्य तुच्छ समजवायला लावते याचा प्रत्यय चार्वाकापासूनच्या सर्व शहीदांच्या जगण्यातून येतो. डॉ. दाभोळकर, कॉ. पानसरे आणि प्रा. कलबुर्गी यांच्याही कार्यनिष्ठा त्याच तोडीच्या होत्या. ही कार्यनिष्ठा मृत्यू नावाच्या गोष्टीला कधीच डरत नाही किंवा भौतिक सुखाची आणि सुरक्षिततेची त्यांना गरज वा मातब्बरी वाटत नाही. महाविद्यालयीन शिक्षण घ्यायला जाताना कलबुर्गी सरांच्या वडिलांनी त्यांना सांगितले होते की, घोंगडी आणि आंबील (सर्वसाधारण शेतकऱ्याच्या घरातील पोट भरण्यासाठी असलेला रोजचा एक सर्वसाधारण पदार्थ) हीच आपली मोठी आणि पुरेशी संपत्ती. म्हणजे तुकोबाराय कंथा आणि कमंडलू देह उपचारापुरता असे जे म्हणतात, तेच आजच्या काळात कलबुर्गी सरांचे वडील त्यांना सांगतात. याच मानवतावादी संस्कारातून अनेक मोठमोठी मान

सन्मानाची पदे मिळूनही डॉ. कलबुर्गी निस्पृह, निरोगी, साधे आणि काटकसरी राहिले. कर्नाटकातील सर्वोच्च साहित्यिक 'पंपा' पुरस्काराची रक्कम जी त्याकाळात खूप मोठी होती ती त्या काळातही ते सहजपणे नाकारू शकतात किंवा हम्पीच्या कुलगुरूपदी काम करताना कुलगुरू म्हणून मिळालेली सर्व भत्यांची रक्कम तिथल्या चतुर्थश्रेणी कामगारांसाठी खर्च करण्याचा उदारपणा ते दाखवू शकतात. पदवीसाठी आणि वेतनवाढीसाठी ज्यांना संशोधन करावयाचे आहे त्यांनी माझ्याकडे येऊ नये असे ते स्पष्टपणे सुनावतात. वचनातून सापडलेला लिंगायत धर्म काटेकोर आचरणात आणायचा प्रयत्न करतात. शरण संतांनी निर्माण केलेल्या वचनांची व्याख्या 'सुंदर आचरण असणाऱ्यांची सुंदर रचना म्हणजे वचन होय.' अशी किंवा 'सुंदर बोलचालीची अभिव्यक्ती म्हणजे वचन होय' अशी करतात. इथे पुन्हा तुकोबांच्या 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' या उक्तीचीच आठवण येते.

श्रमण संस्कृतीतून निर्माण झालेल्या अवैदिक परंपरांचा स्वतःच्या कुटील हेतूंसाठी ढाल म्हणून उपयोग करणाऱ्या तथाकथित हिंदुत्ववाद्यांना डॉ. एम.एम. कलबुर्गी 'मी हिंदू नाही, मी लिंगायत आहे, मी द्रवीड आहे' असे जेव्हा जाहीरपणे बजावू लागले तेव्हा हिंदू धर्माच्या बुरख्याखाली दडलेल्या ब्राह्मण्यवाद्यांना पायाखालची जमीन सरकल्यासारखी वाटणे साहजिक आहे. याच्याआधी कलबुर्गी सरांनी बसव तत्त्वज्ञानाच्या डोक्यावर बसून ब्राह्मणी तत्त्वज्ञानाचा अजेंडा असलेल्या पंचाचार्याविरुद्ध संघर्ष मांडलाच होता. पण ब्राह्मणी अजेंड्यातील जात व्यवस्थेला हा केवळ विरोध आहे असा सोयीस्कर अर्थ ब्राह्मण्यवाद्यांनी घेतला. आजच्या तथाकथित विज्ञान युगामध्ये या हिडीस जातव्यवस्थेचे समर्थन करणे सहज शक्य नाही, याची जाणीव ब्राह्मण्यवाद्यांना आहे. म्हणून तेही याचा आपल्या शैलीत विरोध करतात. पण ही व्यवस्था मोडली जाणार नाही याची विविध पद्धतीने आटोकाट काळजी घेतात. पण मी हिंदू नाही हा केवळ निर्णायकच नाही तर मुळावरच हल्ला होता. शीख, जैन, लिंगायत इ. अवैदिक परंपरा या वेगवेगळ्या नावाने वावरत असल्यातरी त्या हिंदू धर्माच्याच शाखा आहेत आणि यांच्या नेतृत्वपदी आपणच आहोत असा इथल्या ब्राह्मण्यवाद्यांनी स्वतःशी भ्रम बाळगला आहे. या भ्रमात स्वतःचे सत्ताकेंद्र सांभाळण्याचा त्यांचा आटोकाट प्रयत्न आहे. व त्यामुळेच आपण हिंदू परिवारातील आहोत असा भ्रम ते या अवैदिक परंपरातही पसरवत आहेत. त्यामुळे डॉ. कलबुर्गींचा 'आम्ही हिंदू नाही' हा त्यांच्यासाठी सुरुंगच होता. त्यामुळे स्वतःच्या सुरक्षेचा अखेरचा प्रयत्न म्हणून डॉ. कलबुर्गींना संपविणे हाच त्यांच्यापुढे एकमेव पर्याय असावा आणि त्यांनी तो वापरला. याआधीही धाकदपटशातून आणि

दहशत निर्माण करून कलबुर्गी सरांचा आवाज बंद करण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. पण 'मी सत्य बोलणे सोडणार नाही' या भूमिकेशी ते ठाम होते. सत्य सर्वदूर परसरण्यासाठी सत्य मांडणाऱ्यांच्या निष्ठेची अशी परीक्षा घेते. प्रा कलबुर्गी सरांनी ती परीक्षा दिली. त्यात ते अत्युच्य श्रेणीने पास झाले. त्यांनी पेटविलेली सत्याची चूल आज वणवा झाली आहे. त्यामुळे ज्यांनी त्यांच्या विरुद्ध संघर्ष मांडला होता त्या धर्मांध शक्तींची आणखीच पंचाईत झाली आहे हे खरे !

ॐ

५.
धार्मिकतेच्या मुखवट्याआडून...

गेल्या तीन वर्षात तीन महत्त्वाच्या आणि सामाजिक क्षेत्रात विशेष दखलपात्र असलेल्या व्यक्तींच्या म्हणजे डॉ. दाभोळकर, कॉ. पानसरे आणि प्रा. डॉ. कलबुर्गी यांच्या निर्घृण हत्या झाल्या. या हत्या व्यक्तिगत सूडभावनेतून झालेल्या नाहीत किंवा प्रस्थापित राज्ययंत्रणेत एखादे महत्त्वाचे पद मिळविण्याच्या दृष्टीनेही झालेल्या नाहीत. या तीनही व्यक्ती ज्या क्षेत्रात काम करत होत्या, ते क्षेत्र आणि त्यासाठी त्यांनी चालवलेल्या चळवळी यांचे नीट परिशीलन केले, तर एक गोष्ट सहजपणे लक्षात यायला हवी. या तीनही व्यक्ती विवेकवादाच्या आत्यंतिक आग्रही होत्या. म्हणजेच आजूबाजूचे सामाजिक व्यवहार ज्यामध्ये आर्थिक, राजकीय आणि सामाजिक व्यवहार अंतर्भूत आहेत, ते विवेकाच्या पायावर चालावेत हीच त्यांची अतोनात धडपड होती. निसर्गाने 'भावना' आणि 'बुद्धी' या दोन गोष्टी मानवी आयुष्याचा तोल राखण्यासाठी मानवी मेंदूत निर्माण केल्या आहेत. बुद्धी ही गोष्ट तर्क, विवेक आणि मानवता या घटकांवर पोसली जाते, तर भावना प्रेम, करूणा आणि हिंसा या घटकांवर जोपासली जाते, असे मेंदूच्या आणि मानवी वर्तनाच्या अभ्यासकांचे मत आहे, ते मान्य व्हायला कसलीच हरकत नसावी. पण भारतातच नव्हे तर जवळपास सर्व पृथ्वीवर भावना आणि बुद्धी यांचा समन्वय जो सांभाळला जायला हवा आणि तो सांभाळण्यासाठी जी सामाजिक परिस्थिती असायला हवी, त्याचा तोल सांभाळलेला दिसत नाही. अर्थात हा तोल विषम राहण्यातच काहींचे हितसंबंध जोडलेले आहेत. हे हितसंबंध खाजगी मालमत्तेच्या प्रभावातूनच निर्माण झालेले आहेत व होत असतात हेही लक्षात घ्यायला हवे. अशा पार्श्वभूमीवर ज्या राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक व्यवस्था उदयास येतात, त्या अल्पसंख्य मूठभरांच्या हितसंबंधी असतात. बहुसंख्यांच्या ते मालमत्ताविहीन असल्याने किंवा अल्प मालमत्ताधारक असल्याने अपरिहार्यपणे हितविरोधी असतात. या सर्वच व्यवस्थांचा मुखडा आधुनिक जगात व्यक्तिस्वातंत्र्याचा, लोकशाहीचा आणि तथाकथित समतेचा आग्रह दिसतो. पण वास्तवात ती गोष्ट तशी नसते व नाही. वर उल्लेख केलेल्या तीन महानुभावांच्या हत्येनंतर भारतीय समाज असहिष्णू असल्याचा साक्षात्कार अनेकांना होऊ लागला आहे व तशी माध्यमांद्वारे जोरदार जाहिरात चालू आहे. काही काळापूर्वीच याच्या उलट 'मेरा भारत महान' असे सांगत भारतीय समाजाचा उदोउदोही माध्यमांद्वारेच चालविला गेला होता. २०२० पर्यंत जागतिक महासत्ता बनण्याचे गाजरही दाखवले

जात होते. तोच समाज अजून किती मागासला आहे याचे विश्लेषण आता अहमहमिकेने चालू आहे.

संपूर्ण समाज असहिष्णू आहे की कोणतातरी समाजाचा विशिष्ट घटक? मुळात अलीकडे उदयास आलेला 'असहिष्णू' शब्द नेमका व पुरेसा आहे का? नसेल तर या प्रकारच्या दिसून येणाऱ्या प्रवृत्तीस पर्यायी योग्य शब्द कोणता? व तशा वृत्तीचे पोषण करणारे कुठले घटक आहेत? या सर्वांचा मुळात जाऊन शोध घ्यायला हवा. असहिष्णुता याचा शब्दशः अर्थ सहन न करण्याची वृत्ती, असा सांगता येईल. वेगळ्या शब्दांत दुसऱ्यांबद्दल सहानुभूती न वाटणे असाही सांगता येईल. पण आजच्या संदर्भात मात्र या शब्दाला आणखी एक वेगळे परिनाम लाभले आहे. दुसऱ्याचे मत अजिबात न स्वीकारणे असे म्हणण्यापेक्षा न सहन करणे म्हणता येईल. अधिक पुढे जाऊन दुसऱ्याला आपले मत मांडण्याचा जो नैसर्गिक स्वातंत्र्याचा हक्क आहे, ते स्वातंत्र्यच नाकारणे असाही होतो. मग ते नाकारलेले स्वातंत्र्य जो मागू पाहतो त्यालाच या जगातून नष्ट करणे ही आपसूकच पुढची पायरी येते. पण केवळ दुसऱ्याचे मत पटत नाही म्हणून ते मत मांडणाऱ्यालाच नष्ट करण्याइतके सामान्य माणसाजवळ बळ आणि इच्छाशक्ती असते का? याचाच अर्थ एक माणूस म्हणून अशा प्रकारचे वर्तन सहजसाध्य आणि सोपे नाही. मग असे विरोधी मत मांडणाऱ्याला कोण नष्ट करते? त्यामागे कुणाचे हितसंबंध दडलेले असतात याचा सत्यान्वेशी शोध घेतला नाही, तर संपूर्ण समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून वेठीला धरण्यासारखा हा प्रकार आहे. हे वास्तवाला व तर्काला धरून नाही.

याचमुळे असहिष्णुता हा शब्द वापरताना ज्यांना खऱ्या विरोधी शक्तीविरोधात बोलायचे आहे; पण बोलायचे धाडस नाही, अशा व्यक्तींनी स्वतःपुरती या शब्दाने स्वतःची सोय करून घेतली आहे.

स्वातंत्र्याचा प्रश्न सत्तेशी जोडलेला आहे. सत्ताधाऱ्यांना आपली सत्ता व त्यासाठी त्यांनी वर्चस्वातून मिळविलेले स्वातंत्र्य जपणे महत्त्वाचे असते. आपल्या सत्तेला किंवा तथाकथित सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या व्यक्ती व शक्तींची नेहमीच दहशत असते. त्यामुळे अशा प्रकारची आव्हाने येनकेन प्रकारे मोडून काढण्याचा त्यांचा आटोकाट प्रयत्न असतो. म्हणजेच अशा प्रकारे होणाऱ्या व उल्लेखित हत्या या मूलतः राजकीय असतात. कुणाच्या तरी शोषणाधिष्ठित वर्चस्वाला दिल्या गेलेल्या आव्हानाला प्रतिक्रियास्वरूप असतात हे प्रामुख्याने लक्षात घ्यायला हवे. या वर्चस्ववादाला जगभर 'फॅसिझम' म्हणून ओळखले जाते. असहिष्णुता या शब्दापेक्षा वर्चस्ववाद हा अधिक सुयोग्य शब्द आणि आज निर्माण झालेल्या परिस्थितीचे

अधिक वस्तुनिष्ठपणे राजकीय विश्लेषण करणारा शब्द म्हणून मला योग्य वाटतो. हा वर्चस्ववाद आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक हितसंबंधातून निर्माण होतो.

माणसाच्या 'प्राणी'पणापासून त्याला वेगळे करणारी गोष्ट म्हणजे सांस्कृतिक व्यवस्था. मनुष्य संस्कृती निर्माण करतो हे पूर्ण सत्य नाही. मानवी विचारप्रक्रिया स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवण्याची सत्तेला म्हणजेच सत्ताधारी शक्तींना नेहमीच आवश्यक वाटणारी गोष्ट आहे. ही गोष्ट संस्कृती नावाच्या हत्यारानेच होऊ शकते. आपल्याला हव्या तशा प्रतिसादांची आणि मूल्यांची निर्मिती करण्यासाठी सत्ताधारी हे हत्यार वापरतात. हे हत्यार आपल्या बाजूने कार्यरत रहावे म्हणून त्याची व्यवस्था तयार करतात. संस्कृतीचे नियमन करण्यासाठी धर्म आणि कला या दोन महत्त्वाच्या बाबी असतात. स्वतःच्या आणि विश्वाच्या रहस्यमयतेचे कुतूहल आणि अस्तित्वाविषयी अपार काळजी वजा भीती यातून मनुष्य, निसर्ग आणि स्वतःमध्ये अनुबंध निर्माण करण्यासाठी 'देव' नावाची निर्मिती करतो. या देवाच्या भीतीने त्याचा लोभ निरंतर आपल्यावर राहावा किंवा त्याच्या अवकृपेचे बळी होऊ नये यासाठी आपले व्यवहार निर्धारित करणे याला धर्म ही संज्ञा आहे. त्यामुळे धर्माच्या माध्यमातून आपल्याला हवी ती मूल्ये, हव्या त्या श्रध्दा आणि सत्तेबद्दलच्या निष्ठा संप्रेषित करता येतात. हे सत्तेला चांगलेच माहीत आहे. केवळ त्यासाठीच धर्म ही गोष्ट आपल्या नियंत्रणात कशी राहील आणि देवाबद्दलच्या मुळातच असलेल्या काल्पनिक भीतीतून निर्माण होणाऱ्या श्रद्धांतून विवेकाचा अंश कसा राहणार नाही हाच प्रयत्न बहुतेक धर्मश्रद्धांतून जोपासला जातो. प्रेषितांनी सांगितलेल्या मानवतावादी नीतिमूल्यांची ढाल पुढे करत समाजातला वर्चस्ववादी वर्ग (जो राजकीय सत्ताधारी आणि पुरोहित वर्गाच्या रूपाने प्रामुख्याने आपल्याला दिसत असतो) या धर्माचा वापर आपले अस्तित्व राखण्यासाठी करत असतो. पण सर्वच माणसांना काही विवेकहीन बनवता येत नाही. कारण निसर्गाने मेंदूची रचनाही तर्क सुसंगत विचार करू शकण्याच्या दिशेनेच केलेली आहे. किमान काही माणसे तरी कितीही प्रभाव टाकला किंवा गोंधळाची परिस्थिती असली तरी आपल्या मेंदूची कार्यपद्धती शाबूत ठेवू शकतात. ही मानवाच्या दृष्टीने उपकारकच गोष्ट आहे. ही माणसे सत्ताधारी व्यवस्थेला अडथळा आणि अडचणीची असतात. त्यामुळे अशा लोकांना नष्ट करणे हेच त्यांचे ध्येय असते.

याचा अर्थ असा की, संपूर्ण समाजालाच ही माणसे नको असतात हे चूक आहे. पण बहुसंख्य समाज हा वर्चस्ववादाच्या प्रभावाखाली असतो किंवा आणला जातो किंवा काहीवेळा सत्तेच्या ताकदीपुढे स्वतःला निर्बल समजतो. त्यामुळे अशा

हत्यांकडे घाबरून पाहतो किंवा वर्चस्ववाद्याच्या प्रभावाखाली येऊन भावनिक पातळीवरचा हिंसात्मक उन्माद अनुभवतो. त्याचाच परिणाम भ्रामक का होईना पण अपराधीपणाच्या भावनेतून ते मुक्त राहतात. या बाबतीत धर्म आणि धर्मश्रद्धा खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. कारण धर्मश्रद्धांची चिकित्सा करणे हे अनैतिक आणि पाप या संकल्पनेत समाविष्ट केलेली गोष्ट असल्यामुळे धर्माचे लेबल लावले की, त्या घटनेची तर्क सुसंगत तपासणी करण्याची बंदी मनुष्य स्वतःच स्वतःला घालून घेतो.

हिंदू धर्म नावाच्या व्यवस्थेत तर एकाच वेळी दोन परस्पर विरोधी धर्म नांदण्याचे कौशल्य भारतीय वर्चस्ववादाने दाखविले आहे. वैदिक आणि अवैदिक ज्याला ब्राह्मणी व अब्राह्मणी असेही संबोधता येईल. या दोन्ही परंपरा तत्त्वज्ञानाच्या पातळीवर थेट एकमेकांसमोर शत्रू म्हणूनच उभ्या आहेत. ब्राह्मणी धर्म थेट वसिष्ठ, याज्ञवल्कपासून आताच्या स्वतःच्या हिंदुत्ववादी म्हणविणाऱ्या संघ परिवारापर्यंत आहे. अब्राह्मणी धर्म हा चार्वाकापासून बुद्ध ते आजच्या विवेकवादी चळवळीपर्यंत आपली नाळ बांधून आहे. पहिला धर्म हा थेट काही विशिष्ट गटांचे, समूहांचे हितसंबंध राखणारा आणि त्यामुळेच विषमता पोसणाऱ्या व वरकड संपत्तीचा आयता लाभ मिळविणाऱ्या व्यवस्थेचा समर्थक आहे. त्यामुळेच आपोआप तो मानवता विरोधी, अमानुष बनत जातो. दुसरा धर्म किंवा परंपरा ही समतेचा पुरस्कार करणारी श्रमाधिष्ठित आणि मानवतावादी आहे. त्यामुळे कुठल्याही माणसावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अन्याय होऊ नये, त्याच्या नैसर्गिक स्वातंत्र्याचा संकोच होऊ नये आणि त्याचे मूलभूत अधिकार कोणी हिरावून घेऊ नये यासाठी प्रयत्नशील असतो. बौद्ध धर्माच्या ऱ्हासानंतर या देशात ब्राह्मणी धर्माचे समर्थकच वर्चस्वात राहिले. राजकीय व्यवस्थेला धर्मश्रद्धांचा आधार देऊन त्यांनी एक प्रकारे उद्भवू शकणाऱ्या लोकक्षोभापासून सत्ताधाऱ्यांना अभय मिळवून दिले. त्या बदल्यात सांस्कृतिक माध्यमावर पकड ठेवण्यासाठी त्यांच्याकडून संरक्षण मिळवून स्वतःचे वर्चस्व कायम ठेवले. ३००० बौद्ध भिक्खुंची कत्तल करून इ.स. दुसऱ्या शतकातील या घटनेला धार्मिक अधिष्ठान मिळवून दिले. आपल्या प्रभावाने एका अमानुष खुन्याला तारणहाराच्या भूमिकेत प्रस्थापित केले. १२ व्या शतकात बसवण्णांच्या नेतृत्वाखालील लिंगायत शरणांचे क्रूर हत्याकांड घडवून पुन्हा धर्माच्या चौकटीत बसवून त्याला पुण्यकर्म ठरविले. १७ व्या शतकामध्ये शेतकऱ्यांच्या बाजूने उभ्या राहिलेल्या लिंगायत जंगमांचा शिरच्छेद करून धर्माच्या नावाखाली सामान्य जनतेला एका महासंकटातून वाचविल्याचा भ्रम त्यांनी धर्माच्या नावावर पसरविला. या अवैदिक परंपरेचे चांगुलपण समोर ठेवत ब्राह्मणी धर्माच्या समर्थक वर्चस्ववाद्यांनी

इथल्या सामान्य जनतेला सांस्कृतिक पातळीवर, भावनिक स्तरावर ठेवून जे आपले वर्चस्व राखले आहे ते आजतागायत आपल्या हितसंबंधासाठी किंवा ब्राह्मणवाद्यांनी केलेल्या हत्याकांडाची मी वानगीदाखल वरील उदाहरणे दिली आहेत. अशी हत्याकांडे देशात गेली दोन अडीच हजार वर्षे सातत्याने चालू आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. आजही तेच घडत आहे. कारण हे ब्राह्मणी धर्माचे समर्थकच आपला वर्चस्ववादी अजेंडा राबविण्यासाठी हे सारे घडवित आले आहेत. त्यासाठी सर्वसामान्य माणसाचा भावनिक स्तर हिंसेच्या पातळीवरच कसा राहिल याची ते सर्वच पातळीवर काळजी घेतात. विवेकाला साद घालणारी कलाकृती, साहित्य त्यांच्यापर्यंत कसे पोहोचणार नाहीत यासाठी सर्व सांस्कृतिक माध्यमे आपल्याच ताब्यात कशी राहतील यासाठी जीवघेणी काळजी करतील. चित्रपट, नाटक, दूरदर्शन मालिका यातून दाखविल्या जाणाऱ्या सर्व गोष्टींवर त्यांना हव्या असलेल्या धार्मिक श्रध्दांचा पगडा कसा राहिल याचीच खबरदारी ते घेत असताना प्रामुख्याने दिसत आहेत. इथे दुसऱ्यांच्या मताचा अनादर करण्याचा प्रश्नच नाही. ते मत त्याने मांडू नये यासाठी तो कधी त्या बौद्धिक स्तरावर येणारच नाही याचा आकांताने प्रयत्न करणारी ही व्यवस्था आहे.

या पार्श्वभूमीवर या हत्यांकडे ज्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला असेही म्हणण्याचा प्रघात आहे जरा अधिक खोलवर राजकीय दृष्टीने पाहून समजून घेण्याची गरज आहे, कारण हा केवळ एका धर्मातील श्रद्धांचा प्रश्न नाही. तुम्ही कुठल्याही धर्माचे असा पण तुम्ही विवेकाबद्दल बोलत असाल तर तुम्हाला जिवंत राहण्याचा अधिकार नाही असेच हे वर्चस्ववादी मंडळी या हत्यांद्वारे आपल्याला सूचित करत आहेत. त्यासाठीच फक्त त्यांनी धार्मिकतेचा मुखवटा चढविला आहे. कारण कुठल्याही धर्माने (अवैदिक परंपरा सोडून) आपल्या श्रद्धा तपासून घेण्याची मुभा ठेवलेली नाही.

आर्थिक, लैंगिक किंवा वैयक्तिक रागालोभापायी होणारे खून किंवा हत्या आणि राजकीय हत्या यांच्यात मूलभूत फरक आहे. पहिल्या प्रकारच्या हत्या या पूर्णपणे वैयक्तिक स्वरूपाच्या आणि केवळ व्यक्तिगत भौतिक फायद्या-तोट्यांना समोर ठेवून केलेल्या असतात. अशा खुनांचे शोध किंवा उकल करणे फारसे अवघड नसते. पण अशा खुनांच्यामुळे सामाजिक हानीही कुणाला जाणवत नाही. पण राजकीय हत्या या वेगळ्या आणि एकूण समाजावर दूरगामी परिणाम घडविणाऱ्या असतात. राजकीय हत्यांमध्येही दोन प्रकार आहेत. पहिली हत्या ही सत्तास्पर्धेतून होते. अशा हत्यांचे खुनीही सहज पकडले जाऊ शकतात आणि अशा हत्यांनी समाजाचे मूलभूत

असे फारसे नुकसान न होण्याचेच प्रमाण जास्त असते. दुसऱ्या प्रकारची राजकीय हत्या मात्र सत्तेला म्हणजे व्यवस्थेला बदलण्यासाठी किंवा दुरुस्त करण्यासाठी ज्या शक्ती व व्यक्ती उभ्या राहतात. ज्यांचा प्रस्थापित सत्तेच्या आणि तिने निर्माण केलेल्या व्यवस्थेच्या अस्तित्वालाच धोका वाटतो, त्यांना नष्ट करण्यासाठीच होतात. अशा प्रकारच्या हत्यांमध्ये खुद्द प्रस्थापित व्यवस्था आणि तिचे समर्थक असल्यामुळे प्रत्यक्षात ज्यांच्यामार्फत या हत्या घडविल्या जातात, ते सत्ताधाऱ्यांनी निवडलेले बळीचे बकरे असतात. कायद्याच्या भाषेत आणि आजच्या न्याय्य व्यवस्थेच्या संदर्भात ते प्रत्यक्ष कुणी असले तरी या खुनांचे सूत्रधार मात्र त्यांच्यामागे उभी असलेली प्रस्थापित व्यवस्था आणि सत्ताधारीच असतात हेही लक्षात घेतले पाहिजे. हे सत्ताधारी नेहमीच राजकीय सिंहासनावर बसलेले असतात असे नाही तर एकूण मानवी मेंदूच्या वर अंतिम सत्ता गाजविणारी जी सांस्कृतिक व्यवस्था असते जी धर्म, कला, साहित्य इत्यादी माध्यमातून प्रकट होत असते या व्यवस्थेला आपल्या कह्यात ठेवू पाहणाऱ्या सांस्कृतिक व्यवस्थेचे दावेदार राहण्याचा ते प्रयत्न करतात. लोकशाही लोकमतावर अवलंबून असते आणि लोकमत हे प्रस्थापित सांस्कृतिक व्यवस्था निर्धारित करत असते. त्यामुळे राजकीय सत्ताधारी देखील या सांस्कृतिक सत्ताधाऱ्यांना टरकून आणि दबकून असतात. भारतीय संविधानामध्ये एका आदर्श समाजाच्या सर्व शक्यता कायदेशीररित्या निर्माण केलेल्या असल्या तरी इथले राजकीय सत्ताधारी परंपरा शरण आहेत. त्याचे हे एक प्रमुख कारण आहे. त्यामुळेच अशा हत्यांच्या खऱ्या सूत्रधारांना हात लावण्यास राजकीय सत्ताधारी दबकतात. खरेतर हे सूत्रधार म्हणजे एक विचारधारा असते आणि या विचारधारेला प्रवाहित करणाऱ्या त्यांच्या अनेक समविचारी संघटना असतात. अशा हत्यांना प्रतिबंध करणे म्हणजे अशा विचारधारांना प्रवाहित करणाऱ्या संघटनांना प्रतिबंधित करणे. पण राजकीय सत्ताधाऱ्यांना त्यांच्या अस्तित्व चिंतेपायी हे शक्य होणे थोडे अवघडच. डॉ. दाभोळकर, कॉ. पानसरे आणि प्रा. डॉ. कलबुर्गी यांच्या हत्या या त्या व्यक्तींच्या हत्या नाहीत तर इथल्या प्रस्थापित सांस्कृतिक व्यवस्थेला आपल्या विचार परंपरेच्या विरोधाचे प्रतिक वाटतात. ही प्रतिके नष्ट करून त्या अशा पुरोगामी विचार परंपरांना नष्ट किंवा दहशत बसवू पाहतात. मानवी स्वातंत्र्याचा संकोच करणारी त्याच्या प्रतिभेला आणि श्रमशक्तीला गुलाम करू पाहणारी ही सांस्कृतिक व्यवस्था नष्ट करून श्रमाधिष्ठित, समताधिष्ठित आणि प्रेमाधिष्ठित आदर्श समाजव्यवस्था निर्माण करणे हे विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे काम आहे. शहीद झालेले तीनही महामानव तेच काम करत होते. म्हणून या हिंस्र सांस्कृतिक व्यवस्थेने या तिघांची हत्या केली. कुत्र्याला दगड मारला तर कुत्रा दगडाचा चावा घेतो, सिंहाला दगड मारला तर मात्र तो दगड

मारणाऱ्यावर झेप घेतो. पुरोगामी शक्तींनी आणि व्यक्तींनी आपल्या शहिदांचा खून करणाऱ्या नेमक्या शक्ती व प्रवृत्ती ओळखल्या पाहिजेत एवढेच या निमित्ताने मांडावेसे वाटते.

ॐ

वचन साहित्याधारित ग्रंथ यादी

१) बसवण्णांविषयीचे शिलालेख
२) शिलालेखातील शिवशरण
३) वचन साहित्याचे प्राचीन स्त्रोतकोश
४) बसवस्त्रोताची वचने – १
५) शिवयोग प्रदीपिका
६) इम्मडी चिक्क भूपालाचे सांगत्य
७) बसवण्णांची टीकासहीत वचने
८) कोंडगोळी केशीराजाची कृती
९) तोंदट सिध्देश्वर भावरत्नाभरण स्त्रोत
१०) बसवण्णांची टीकासहीत वचने – २
११) चेन्नबसवण्णा षट्स्थल वचन महाखंड
१२) वचन संकलन खंड – ४
१३) बसवण्णांची वचने
१४) संकीर्ण वचन संपूट – १
१५) सिद्धरामेश्वरांची वचने
१६) वचनशास्त्रसार
१७) बसवमार्ग – १
१८) बसवमार्ग – २
१९) शिवशरणांचा कायक सिध्दांत बसवमार्ग – ३
२०) कर्नाटक गांधी हर्डेकर मंजप्पा
२१) वचन साहित्य प्रकटनेचा इतिहास
२२) केळदी संस्थान – समग्र अध्ययन
२३) सारंगश्री
२४) स्वादी राजघराणे
२५) बिळगी राजघराणे
२६) स्वरवचन विचार संकीर्ण संपुट
२७) शिवानुभव पत्रिका
२८) कल्याणची अवनती
२९) भारत स्वातंत्र्य आणि कर्नाटक एकीकरणात लिंगायतांचे पात्र

(संदर्भ : महामार्ग, पृ. ८८२)

दैवी चमत्कार नव्हेत,
ही पोटार्थी गारूड्यांची हातचलाखी

मंचावर उलगडून दाखवत होते ते कार्यकारणभाव
त्यांनी त्यांना गोळ्या घातल्या
तेव्हा मी प्रेक्षकांत होतो
मला नक्की ठाऊक आहे
की त्यांचे खरे लक्ष्य मीच होतो
इतिहासाला फासलेला रंग खरवडून
ते खरा इतिहास ऐकवत होते.
पोटतिडकीने मंचावरून
त्यांनी त्यांना गोळ्या घातल्या
मला नक्की ठाऊक आहे
की त्यांचे खरे लक्ष्य मीच होतो
मोर्च्यासमोर उभे राहून
ते सांगत होते
की आम्ही तुमचे गुलाम नाही
त्यांनी त्यांना गोळ्या घातल्या
मला नक्की ठाऊक आहे
की त्यांचे खरे लक्ष्य मीच होतो
मला आता नक्की उमजलंय
ते मंचावर उभ्या किंवा मोर्च्यासमोरच्या
म्होरक्याला गोळी घालू शकतात
पण प्रेक्षकाला वेधणारी
श्रोत्यांना संपवणारी
मोर्चेकऱ्याला जायबंदी करणारी
गोळी त्यांच्याजवळ अजिबात नाहीयं
आता
प्रेक्षकांनीच
श्रोत्यांनीच
मोर्चेकऱ्यांनीच
म्होरक्या व्हायला हवं...

– राजा शिरगुप्पे, 'प्रॉमिथिअस'

"मला माहिती आहे समोरच्या गर्दीतला कुणीतरी माझ्यावर गोळी झाडायला टपलाय, पण मी त्याला सांगू इच्छितो, हे बघ मित्रा, या बंदुकीच्या पाठीमागे हात असतात ते फक्त भित्र्या माणसाचे. म्हणूनच टाक ती बंदूक, सोड ती भीती, चल आपण दोघे मिळून शोधूया प्रकाशाच्या नवीन वाटा."

– डॉ. नरेंद्र दाभोळकर

"ज्यांना कुणाला माझं वाईट करायचं असेल त्यांनी खुशाल करावं. मी कुणाच्या बापाला भीत नाही."
"ज्यांचं बरं चाललं आहे त्यांना परिवर्तनाची गरज नसते. पण ज्यांचं बरं चाललेलं नाही त्यांनाच परिवर्तनाची गरज असते."

- कॉ. गोविंद पानसरे

"...भारतासारख्या भावनिष्ठ राष्ट्रात संशोधन म्हणजे सरळ सुलभ मार्ग नव्हे. 'कटू सत्य सांगू नये' असे सांगणाऱ्या संप्रदायाचे वारसदार असलेल्या भारतीयांना असे सत्य सहजासहजी पचनी पडत नाही, मधुर वाटत नाही. त्यामुळे या देशात संशोधकांना वेळोवेळी लहान-सहान सुळावर चढावेच लागते."

– प्रा. डॉ. एम. एम. कलबुर्गी

सहयोग मूल्य रु. १०/-